


# शेती व्यवसायावरील अरिष्ट

शेषराव मोहिते

# शेती व्यवसायावरील

# अरिष्ट

डॉ. शेषराव मोहिते

जनशक्ती वाचक चळवळ

जनशक्ती
वाचक
चळवळ

**Sheti Vyavasayavaril Arishta**
Sesharao Mohite

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ,
'पिनाक', २४४, समर्थनगर,
औरंगाबाद. ४३१ ००१.
दूरभाष : (०२४०) २३४१००४
Email : janshakti.wachak@gmail.com

© डॉ. शेषराव मोहिते
'जागल', यमुना हौसिंग सोसायटी,
जुना औसा रोड, बांधकाम भवनामागे,
लातूर-४१३५१२.
मो. ९४२१३६२९२९

मुद्रक
रुद्रायणी, औरंगाबाद.

मुखपृष्ठ
मीडिया केअर

अक्षरजुळणी
जनशक्ती वाचक चळवळ
औरंगाबाद.

पहिली आवृत्ती - १० डिसेंबर२००७
दुसरी आवृत्ती - २५ नोव्हेंबर २००९

**मूल्य : ३० रु.**

शेतकरी संघटनेसाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या
***प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे***
सरांना...

# प्रास्ताविक

डॉ. शेषराव मोहिते विद्यार्थिदशेत असताना जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीत आले. त्याच काळात आमची ओळख झाली. छात्र युवा संघर्ष वाहिनीचे महाराष्ट्राचे संयोजक म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. ते उस्मानाबाद जिल्ह्यातील व्हंताळ या गावचे. तरल संवेदना आणि प्रखर विचारांची निष्ठा असणारा हा ग्रामीण भागातील तरुण. समाजाचे वास्तव समजून घ्यायचे आणि नवनव्या बदलांना सामोरे जाताना आपल्या विचारांची पुनर्मांडणी करायची; यासाठी लागणारी जबरदस्त क्षमता असलेला. कृषी विद्यापीठात शिकत असताना शेतकरी आंदोलनाला सुरुवात झाली. कांदा आंदोलनाच्या बातम्या आल्या. प्रामाणिकपणाला अनुभवाचे अधिष्ठान लाभलेल्या मोहितेंना या आंदोलनाचे कुतूहल निर्माण झाले. डॉ. मोहिते स्वाभाविकपणे तिकडे खेचले गेले. शरद जोशींनी केलेला उलगडा धक्कादायक होता. त्यांच्या विचारांचा पाया भक्कम होता. डॉ. मोहिते या विचाराचे पाईक बनले. मराठवाड्यात ज्यांनी शेतकरी आंदोलनाचे बीजारोपण केले, त्यांत शेषराव मोहिते आघाडीवर होते. त्या काळात एखादा झंझावात सुटावा तसे संघटनेची मशाल घेऊन गावोगाव हिंडले. आपल्यांला पटलेल्या विचारांसाठी किती झोकून द्यायचे असते, याची त्यांनी साक्ष दिली. १९८४ मध्ये परभणीला शेतकरी संघटनेचे अधिवेशन झाले. या अधिवेशनाच्या तयारीला कृषी विद्यापीठातून विद्यार्थ्यांची फौज बाहेर काढणे व त्यांचे नेतृत्व करणे सोपे काम नव्हते. ते शेषराव मोहिते यांनी समर्थपणे केले.

विद्यार्थी असतानापासून लेखनाची आवड. मूळ पिंड कवीतेचा. हळूहळू कथा आकाराला आली. 'बरा हाय घरचा गोठा' हा कथासंग्रह १९८३ मध्ये प्रसिद्ध झाला. तो अंबाजोगाईसारख्या छोट्या ठिकाणाहून प्रकाशित झाला म्हणून त्याची फारशी दखल घेतली गेली नाही; परंतु 'माझा पंधरा आगस्ट कवा हाय' ही कविता बरीच गाजली. 'दुर्दशा विकणारे लेखक' या लेखाने ग्रामीण साहित्य चळवळीत हाहाकार उडवून दिला. या चळवळीच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारा हा लेख बराच गाजला. 'असं जगणं तोलाचं' ही त्यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी. शेतकरी कुटुंबातील बालपण चितारणारी. तिला वा. म. जोशी पुरस्कार मिळाला.

ही कादंबरी अनेक पुरस्कारांना पात्र ठरली. त्याच कादंबरीचा पुढचा भाग 'धूळपेरणी' या नावाने २००१ मध्ये प्रसिद्ध झाला. तिला राज्य शासनाचा ह. ना. आपटे हा पुरस्कार मिळाला. शेषराव मोहिते यांचे लेखन हे चळवळीच्या मुशीतून तयार झालेल्या लेखकाचे आहे. त्याची दखल घेतल्याशिवाय ग्रामीण साहित्य चळवळीचा आढावा पूर्ण होत नाही.

कृषिशास्त्रात डॉक्टरेट केल्यानंतर लातूरच्या शाहू महाविद्यालयात ते प्राध्यापक म्हणून रुजू झाले. या महाविद्यालयाच्या गुणवत्तेचा नावलौकिक सर्वदूर आहे. नोकरी करीत असतानाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात रुजलेला मातीचा दर्प कमी झाला नाही. शेतकरी प्रश्नांचे सखोल अध्ययन, विचार मंथन करून ते सातत्याने मांडणी करीत राहिले. एप्रिल २००६ मध्ये नदीवाडी (ता. निलंगा ) येथे युवा चेतना शिबिर झाले. त्यात त्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांविषयी विचार मांडले. ते मर्मग्राही होते. त्यांनी या विषयावर लेखही लिहिले आहेत. या सर्वांना एकत्र करून पुस्तक लिहावे असा आम्ही आग्रह धरल्यामुळे हे पुस्तक त्यांनी तयार केले.

हे पुस्तक लहान असले तरी सर्वस्पर्शी आहे. हे पुस्तक शेतकऱ्यांच्या संवेदनशील मुलाने लिहिले आहे. शेतकरी चळवळीत प्रदीर्घ काळ झोकून दिलेल्या कार्यकर्त्याने लिहिले आहे. एका सिद्धहस्त लेखकाने लिहिले आहे. शेतकरी प्रश्नांच्या अभ्यासकाने लिहिले आहे. त्यामुळे ते लहान असले; तरी अत्यंत महत्त्वाचे ठरते. या पुस्तिकेत लेखकाने शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे स्वरूप तर सांगितले आहेच; त्याचबरोबर त्यांच्या कारणांची विस्ताराने चर्चा केली आहे. शेतीवरच्या अरिष्टाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. २१ व्या शतकाच्या प्रारंभकाळातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा आढावा घेतला जाईल, तेव्हा या छोट्या पुस्तिकेचे संदर्भ घेतले जातील, हे या पुस्तिकेचे महत्त्व आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही गंभीर समस्या सोडविण्याच्या कामी या पुस्तिकेतील विचारांचा उपयोग झाला; तर खऱ्या अर्थाने ही पुस्तिका कारणी लागली असे समजता येईल.

**- अमर हबीब**

# शेती व्यवसायावरील अरिष्ट

एकोणीसशे नव्वद सालानंतर भारताने आर्थिक उदारीकरणाचे धोरण अवलंबिले. जीवनाच्या अनेक क्षेत्रांत जे अनुकूल बदल घडून येत आहेत, त्यांवरून भारतीय अर्थव्यवस्था आता कात टाकून, नव्या पर्वात प्रवेश करीत असल्याचे सार्वत्रिक चित्र दिसत आहे. आर्थिक विकासाचा, प्रगतीचा दरही गेली काही वर्षे सतत वाढत असून एकूणच देशाच्या प्रगतीविषयीचे आशादायी चित्र उभे राहत आहे. शेअर बाजारातील निर्देशांक रोज नवनवीन उच्चांक प्रस्थापित करीत आहे; तर दुसऱ्या बाजूला राज्य सरकार आणि केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी म्हणून कितीही पॅकेज जाहीर करीत असले तरीही आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्यादेखील शेअर बाजारातील सेन्सेक्सच्या वेगापेक्षा अधिक गतीने वाढतेच आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यापासून जवळपास नव्वद एक्क्याण्णव सालापर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप बहुतांशी कृषिप्रधानच होते, पण १९८०-८१ पासून देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये शेतीक्षेत्राचा वाटा सातत्याने घटत आहे. पूर्वी या कमी विकासदरास 'हिंदू विकास दर' म्हणून हिणवले जायचे. भारतीय कृषी अर्थव्यवस्था ही 'फूडग्रेन इकॉनॉमी' म्हणून प्रगत जगामध्ये एक टिंगलटवाळीचा विषय होती. आपल्या देशातील गेल्या साठ वर्षांतील सर्वांत महत्त्वाची आकडेवारी कोणती? तर देशातील सत्तर टक्के लोक खेड्यांत राहतात आणि त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन शेती आहे. लोकसंख्या छत्तीस कोटी होती, तेव्हाही सत्तर टक्के लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधन शेती आणि लोकसंख्या एकशे सहा कोटींवर जाऊन पोहोचली, तरीही सत्तर टक्के लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधन शेतीच. एकेकाळी शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ४८ टक्के होता, तो कमी कमी होत गेला आणि आज २३ टक्क्यांच्या आसपास स्थिरावला आहे; पण सत्तर टक्के माणसं मात्र अजूनही खेड्यांतच आणि शेती व्यवसायांवरच गुजराण करण्याच्या प्रयत्नात. हे काही प्रगत अर्थव्यवस्था किंवा निरोगी अर्थव्यवस्था असल्याचे लक्षण नव्हे.

डिसेंबर २००५ मध्ये इंडियन एक्स्प्रेस ग्रुपच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या फायनान्शियल एक्स्प्रेसने एक गोलमेज परिषद आयोजित केली होती. त्या परिषदेत 'द फायनान्शियल एक्स्प्रेस'चे संपादक मैथिली भुसनूरमथ यांनी एका महत्त्वाच्या

बाबीचा उल्लेख केला. त्यांनी असं म्हटलय : ''१९९१ नंतर वास्तविक खनिज तेल असो वा कृषी क्षेत्र येथील सर्व बदल बाजार नियमांप्रमाणेच झाले पाहिजेत; पण तसे ते होताना दिसत नाहीत; पण त्यातही आश्चर्याची बाब म्हणजे कृषी क्षेत्राच्या मांडवाखाली येणाऱ्या दूध उत्पादनात मात्र भारत गेली काही वर्षे सातत्याने प्रगती करीत आहे. भारत आता जगातील सर्वाधिक दूध उत्पादक देश म्हणून नाव कमावून आहे. दूध उत्पादन क्षेत्रामध्ये आजपर्यंत सरकारी हस्तक्षेपाचे प्रमाण खूप मर्यादित राहिले आहे. त्यामुळेच दूध उत्पादन क्षेत्राची भरीव प्रगती झाली आणि या प्रगतीलाच सध्या 'श्वेत क्रांती' असे नामाभिधान देण्यात येत आहे. थोडक्यात दुग्ध उत्पादन असो वा माहिती - तंत्रज्ञान क्षेत्र असो जिथे सरकारी हस्तक्षेप कमी आहे तेथेच फार मोठी प्रगती झाल्याचे विचित्र 'संकेत' मिळताना दिसतात. हे संकेत पुन्हा बाजार नियमांनुसारच आहेत. जर शासनाने येथेही विकासाच्या नावाखाली काही तंत्रज्ञान योजना आणल्या असत्या, तर विरोधाभासाचे चित्र दिसून आले असते. पण सुदैवाने तसे झाले नाही.''

भारतीय शेती आणि भारतीय शेतकऱ्यांचे दुर्दैव असे, की या आर्थिक उदारीकरणाच्या कालखंडातदेखील नैसर्गिक बाजार नियमांचे कुठलेच फायदे शेती व्यवसायाला मिळू दिले जात नाहीत. कल्याणकारी राज्यव्यवस्था आणि कल्याणकारी अर्थव्यवस्थेचे राज्यकर्त्यांच्या आणि नियोजनकर्त्यांच्या मानगुटीवर बसलेलं भूत जोपर्यंत उतरत नाही, तोपर्यंत शेती व्यवसायाचे दुर्दैवी चित्र बदलणे शक्य नाही.

शेतकऱ्यांच्या वाढत चाललेल्या आत्महत्या ही एकाएकी घडून आलेली प्रक्रिया आहे का? अगदी तुकाराममहाराजांच्या आणि रामदासस्वामींच्या काळातही शेतीची अवस्था काय होती? १६२८-२९ मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या भीषण दुष्काळाचे वर्णन करणारा तुकाराममहाराजांचा एक अभंग प्रसिद्ध आहे.

*'दुष्काळे अटिले द्रव्य नेला मान। स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली।*
*लज्जा वाटे जीवा त्रासलिया दुःखे। वेवसाय देखे तुटी येता ॥'*

हा अनुभव जसा तुकारामांनी घेतला. तसाच रामदासांनीही १६३० मध्ये गोदातीरी अवर्षणाने जो भयंकर दुष्काळ पडला, त्याचे वर्णन केले आहे.

*''तथापि मार्गची चालेना। भीक्षा मागता मिळेना।*
*अवघे भिकारीच जना। काय म्हणावे ॥.....*



*कितियेक ग्रामेचि ते वोस झाली। पिके सर्व धान्येची नाना बुडाली।*
*जन बुडाले बुडाले पोटेविण गेले। बहु कष्टले कष्टले कितीयेक मेले ॥*
*वीसा लोकांत लोकांत एकचि राहिले। तेणे उदंड उदंड दुःखचि साहिले ॥''*

महात्मा जोतिबा फुले यांनीदेखील १८८३ मध्ये 'शेतकऱ्याचा असूड'मध्ये 'शेतकऱ्यांसहित शेतकीची हल्लीची स्थिती' या प्रकरणात ज्या शेतकऱ्याचे वर्णन केले आहे, ते कसे आहे?

''त्याचप्रमाणे दुसरे वर्षी घरांतील बायकामुलांच्या अंगावरील किडूकमिडूक शेतसाऱ्याचे भरीस घालून नंतर पुढे दरवर्षी शेतसारा अदा करण्याकरिता गावातील गुजर-मारवाडी सावकारांपासून कर्जाऊ रकमा काढिल्या आहेत, त्यांतून कित्येकांनी हल्ली मजवर फिर्यादी ठोकल्या आहेत व ते कज्जे कित्येक वर्षांपासून कोडतांत लोळत पडले आहेत. त्याबद्दल म्यां कधी कधी कामगार व वकिलांचे पदरी आळवण्याकरिता मोठमोठाल्या रकमा देऊन, कारकून, चपराशी, लेखक व साक्षीदार यांस भत्ते भरून चिऱ्यामिऱ्या देता देता माझ्या नाकास नऊ आले आहेत.'' आज एखाद्या साथीच्या रोगासारख्या सार्वत्रिक घडून येणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्यासंबंधी वर्तमानपत्रांतून व्यक्त होणारी मतमतांतरे वाचल्यावर पुन्हा एकदा म.फुले यांनी त्या काळी ''नेटीव्ह कामगार आणि गोरे इंग्रज अधिकारी व वर्तमानपत्रांच्या गुलाबी लिहिण्यावर बिलकूल भरवसा न ठेवितां, एकंदर सर्व आपल्या सरकारी खात्यातील गोऱ्या व काळ्या कामगारांस वाजवीपेक्षा जास्ती केलेले पगार अजिबाद कमी करून अज्ञानाने गांजलेल्या दुबळ्या शूद्र शेतकऱ्यांस विद्यादान देऊन त्यांच्या बोडक्यावरील शेतसारा, टोल वगैरे पट्ट्या कमी न केल्यास थोड्याच काळात या जुलमाचा परिणाम फार भयंकर होणार आहे, असे आमच्या ऐषआरामी उधळ्या सरकारच्या कानात सांगतो,'' असे म्हटलेले आहे. तसे दुर्दैवाने आजही लागू पडावे ?

त्या वेळी शेतकऱ्यांच्या बोडख्यावर केवळ शेतसाराच होता, आज अनेक बँका आणि सोसायट्या, त्यांच्या मनगडंत हिशेबाने लावलेले व्याज आणि दंडव्याज (आठ हजार कर्ज असेल तर साठ हजारांची वसुली) या चक्रात अडकलेला शेतकरी! ज्या काही आत्महत्या होत आहेत, त्या जणू काही कुठल्या तरी अज्ञात कारणामुळेच घडत आहेत आणि कितीही 'पॅकेज' जाहीर केले गेले, तरी थांबत नाहीत, असे म्हणण्याचा जो मानभावीपणाचा देखावा चालू आहे, त्यातून कोण कुणाची

बाबीचा उल्लेख केला. त्यांनी असं म्हटलय : ''१९९१ नंतर वास्तविक खनिज तेल असो वा कृषी क्षेत्र येथील सर्व बदल बाजार नियमांप्रमाणेच झाले पाहिजेत; पण तसे ते होताना दिसत नाहीत; पण त्यातही आश्चर्याची बाब म्हणजे कृषी क्षेत्राच्या मांडवाखाली येणाऱ्या दूध उत्पादनात मात्र भारत गेली काही वर्षे सातत्याने प्रगती करीत आहे. भारत आता जगातील सर्वाधिक दूध उत्पादक देश म्हणून नाव कमावून आहे. दूध उत्पादन क्षेत्रामध्ये आजपर्यंत सरकारी हस्तक्षेपाचे प्रमाण खूप मर्यादित राहिले आहे. त्यामुळेच दूध उत्पादन क्षेत्राची भरीव प्रगती झाली आणि या प्रगतीलाच सध्या 'श्वेत क्रांती' असे नामाभिधान देण्यात येत आहे. थोडक्यात दुग्ध उत्पादन असो वा माहिती - तंत्रज्ञान क्षेत्र असो जिथे सरकारी हस्तक्षेप कमी आहे तेथेच फार मोठी प्रगती झाल्याचे विचित्र 'संकेत' मिळताना दिसतात. हे संकेत पुन्हा बाजार नियमांनुसारच आहेत. जर शासनाने येथेही विकासाच्या नावाखाली काही तंत्रज्ञान योजना आणल्या असत्या, तर विरोधाभासाचे चित्र दिसून आले असते. पण सुदैवाने तसे झाले नाही.''

भारतीय शेती आणि भारतीय शेतकऱ्यांचे दुर्दैव असे, की या आर्थिक उदारीकरणाच्या कालखंडातदेखील नैसर्गिक बाजार नियमांचे कुठलेच फायदे शेती व्यवसायाला मिळू दिले जात नाहीत. कल्याणकारी राज्यव्यवस्था आणि कल्याणकारी अर्थव्यवस्थेचे राज्यकर्त्यांच्या आणि नियोजनकर्त्यांच्या मानगुटीवर बसलेलं भूत जोपर्यंत उतरत नाही, तोपर्यंत शेती व्यवसायाचे दुर्दैवी चित्र बदलणे शक्य नाही.

शेतकऱ्यांच्या वाढत चाललेल्या आत्महत्या ही एकाएकी घडून आलेली प्रक्रिया आहे का? अगदी तुकाराममहाराजांच्या आणि रामदासस्वामींच्या काळातही शेतीची अवस्था काय होती? १६२८-२९ मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या भीषण दुष्काळाचे वर्णन करणारा तुकाराममहाराजांचा एक अभंग प्रसिद्ध आहे.

*'दुष्काळे अटिले द्रव्य नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली ।*
*लज्जा वाटे जीवा त्रासलिया दुःखे । वेवसाय देखे तुटी येता ॥'*

हा अनुभव जसा तुकारामांनी घेतला. तसाच रामदासांनीही १६३० मध्ये गोदातीरी अवर्षणाने जो भयंकर दुष्काळ पडला, त्याचे वर्णन केले आहे.

*''तथापि मार्गची चालेना । भीक्षा मागता मिळेना ।*
*अवघे भिकारीच जना । काय म्हणावे ॥.....*



*कितियेक ग्रामेचि ते वोस झाली । पिके सर्व धान्येची नाना बुडाली ।*
*जन बुडाले बुडाले पोटेविण गेले । बहु कष्टले कष्टले कितीयेक मेले ॥*
*वीसा लोकांत लोकांत एकचि राहिले । तेणे उदंड उदंड दुःखचि साहिले ॥''*

महात्मा जोतिबा फुले यांनीदेखील १८८३ मध्ये 'शेतकऱ्याचा असूड' मध्ये 'शेतकऱ्यांसहित शेतकीची हल्लीची स्थिती' या प्रकरणात ज्या शेतकऱ्याचे वर्णन केले आहे, ते कसे आहे?

''त्याचप्रमाणे दुसरे वर्षी घरांतील बायकामुलांच्या अंगावरील किडूकमिडूक शेतसाऱ्याचे भरीस घालून नंतर पुढे दरवर्षी शेतसारा अदा करण्याकरिता गावातील गुजर-मारवाडी सावकारांपासून कर्जाऊ रकमा काढिल्या आहेत, त्यांतून कित्येकांनी हल्ली मजवर फिर्यादी ठोकल्या आहेत व ते कज्जे कित्येक वर्षांपासून कोडतांत लोळत पडले आहेत. त्याबद्दल म्यां कधी कधी कामगार व वकिलांचे पदरी आळवण्याकरिता मोठमोठाल्या रकमा देऊन, कारकून, चपराशी, लेखक व साक्षीदार यांस भत्ते भरून चिऱ्यामिऱ्या देता देता माझ्या नाकास नऊ आले आहेत.'' आज एखाद्या साथीच्या रोगासारख्या सार्वत्रिक घडून येणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्यासंबंधी वर्तमानपत्रांतून व्यक्त होणारी मतमतांतरे वाचल्यावर पुन्हा एकदा म.फुले यांनी त्या काळी ''नेटीव्ह कामगार आणि गोरे इंग्रज अधिकारी व वर्तमानपत्रांच्या गुलाबी लिहिण्यावर बिलकूल भरवसा न ठेवितां, एकंदर सर्व आपल्या सरकारी खात्यातील गोऱ्या व काळ्या कामगारांस वाजवीपेक्षा जास्ती केलेले पगार अजिबाद कमी करून अज्ञानाने गांजलेल्या दुबळ्या शूद्र शेतकऱ्यांस विद्यादान देऊन त्यांच्या बोडक्यावरील शेतसारा, टोल वगैरे पट्ट्या कमी न केल्यास थोड्याच काळात या जुलमाचा परिणाम फार भयंकर होणार आहे, असे आमच्या ऐषआरामी उधळ्या सरकारच्या कानात सांगतो,'' असे म्हटलेले आहे. तसे दुर्दैवाने आजही लागू पडावे ?

त्या वेळी शेतकऱ्यांच्या बोडख्यावर केवळ शेतसाराच होता, आज अनेक बँका आणि सोसायट्या, त्यांच्या मनगडंत हिशेबाने लावलेले व्याज आणि दंडव्याज (आठ हजार कर्ज असेल तर साठ हजारांची वसुली) या चक्रात अडकलेला शेतकरी! ज्या काही आत्महत्या होत आहेत, त्या जणू काही कुठल्या तरी अज्ञात कारणामुळेच घडत आहेत आणि कितीही 'पॅकेज' जाहीर केले गेले, तरी थांबत नाहीत, असे म्हणण्याचा जो मानभावीपणाचा देखावा चालू आहे, त्यातून कोण कुणाची

फसवणूक करण्याचा प्रयत्न करीत आहे, हेच समजेनासे झाले आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या या कर्जबाजारीपणामुळेच घडत आहेत आणि त्यांचा हा कर्जबाजारीपणा त्यांची शेती तोट्यात आहे, यातून आलेला आहे, हे कुणालाच माहीत नाही का? शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाविषयी कोडगेपणाने विचार करणाऱ्या शहरी मध्यमवर्गीयांचा सूर कसा असतो? तर कर्ज घेतलं, मग ते वेळेवर फेडू नये काय? हप्ते थकले म्हणजे दंडव्याज तर लागणारच! आणि कर्जफेड केली नाही तर मग बँकांचे व्यवहार कसे चालावेत? आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचं कसं व्हावं; पण या आतबट्ट्याच्या व्यवसायामुळे थकीत कर्जावर व्याज आणि दंडव्याज आकारण्याचा सर्वच बँकांचा पठाणी खाक्या कुणी समजून घेतो काय? कर्ज सव्वालाख थकल्यानंतर व्याजासह वसुली त्रेचाळीस लाख! त्या शेतकऱ्याने आपली संपूर्ण मालमत्ता विकून टाकली; तरी या त्रेचाळीस लाखांची भरपाई तो करणे शक्य आहे का? पण तरीही त्याच्या कर्जबाजारीपणाविषयी ना राज्यकर्ते संवेदनशील, ना नियोजनात जागा अडवून बसलेले विद्वान ना अवतीभोवतीचा बिगर शेतकरी नागरी समाज !

शेवटी दिलेल्या तक्ता क्र. १ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत केंद्रीय नियोजन आयोगाने शेती आणि संबंधित क्षेत्रावर पंचवार्षिक योजनांमध्ये केलेल्या तरतुदीची आकडेवारी दिलेली आहे. १९५१-५६ या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून १९७४-७९ आणि १९७९-८० च्या वार्षिक योजनेपर्यंत एकूण खर्चांच्या १५ ते १६ टक्के खर्च शेती आणि संबंधित क्षेत्रावर करण्याची तरतूद केली जायची. जेव्हा सत्तर टक्के लोकसंख्या शेती आणि संबंधित व्यवसायांवर अवलंबून होती, १९८०-८५ च्या सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून आज चालू असलेल्या २००२-२००७ च्या दहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत ही तरतूद कमी करून एकदम ५ टक्क्यांवर आणून ठेवण्यात आली. शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण मात्र जवढे होते तेवढेच आहे.

शेतीमालाचे उत्पादन करण्यासाठीदेखील काही खर्च असतो आणि तो शेतकऱ्यास करावा लागतो. शेतीमालाची विक्री केल्यानंतर तो खर्च भरून निघेल, इतका भाव त्याला मिळायला हवा, याची जाणीव आपल्या राज्यकर्त्यांना आणि नियोजनाद्वारे देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्याची स्वप्ने बघणाऱ्या आणि अर्थव्यवस्थेवर संपूर्ण नियंत्रण ठेवू पाहणाऱ्या नियोजन आयोगावरील अर्थतज्ज्ञांना



१९६५-६६ सालापर्यंत तर नव्हतीच. सुरुवातीच्या जवळपास तीन पंचवार्षिक योजना काळात कल्याणकारी राज्यव्यवस्था आणि कल्याणकारी अर्थकारण याचा इतका जबर मोह राज्यकर्त्यांना होता, की त्यातून इथला शेतकरी उद्ध्वस्त होत आहे, याचे भानही कुणी ठेवले नाही. जेव्हा देश अन्नधान्याबाबत सतत मागे पडायला लागला, तेव्हा सुरुवातीस पन्नासच्या दशकात सुरू करण्यात आलेल्या "MF', 'अधिक अन्नधान्य पिकवा' या मोहिमेवर भर देण्यात आला. श्रीलाल शुक्ला यांनी त्यांच्या 'रागदरबारी' या गाजलेल्या कादंबरीत या मोहिमेची खूप खिल्ली उडविलेली आहे. नंतर साठच्या दशकात मेक्सिकोमध्ये डॉ. नॉर्मन बोरलॉग यांनी गव्हाच्या बुटक्या जाती शोधून काढल्या. तोच प्रयोग भारतात डॉ. एम.एस.स्वामिनाथन यांनी केला आणि 'हरित क्रांती'चे पर्व अवतरले. शेतमालाचा उत्पादनखर्च काढण्यासाठी 'कृषी मूल्य आयोग' स्थापन करण्यात आला. त्या कृषी मूल्य आयोगाची शेतमालाचा उत्पादन खर्च काढण्याची पद्धती आणि त्याचा एकंदरीत हेतूच कसा विफल ठरला याची कबुली नंतरच्या काळात हा आयोग स्थापन करण्यात ज्यांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली त्या तेव्हाच्या कृषीमंत्री राहिलेल्या डॉ.सी.सुब्रमण्यम् आणि अकरा वर्षे केंद्रात कृषिराज्यमंत्री राहिलेल्या कै.अण्णासाहेब शिंदे यांनीच देऊन ठेवलेली आहे. 'शेतीमालाला उत्पादनखर्च भरून निघेल इतका भाव देण्याची राज्यकर्त्यांची इच्छाशक्तीच नाही,' असं अण्णासाहेब शिंदे यांनी अनेक वेळा नमूद केलं. शेतकरी सुखी व्हावा असं मनापासून शेतीतून बाहेर पडलेल्या कोणत्याच घटकास वाटत नाही. त्या सर्वांच्याच इच्छाशक्तीच्या अभावाचे बळी आज आत्महत्या करणारे शेतकरी ठरत आहेत.

१९८० मध्ये बंगळूर येथे आयोजित करण्यात आलेल्या आशिया खंडातील कृषिशास्त्रज्ञांच्या एका परिषदेत बोलताना डॉ. नॉर्मन बोरलॉग यांनी इशारा दिला होता : ''आतापर्यंत दुष्काळ, रोगराई, इतर नैसर्गिक आपत्ती यांमुळे दर दहा-वीस वर्षांनी लोक मोठ्या संख्येने मृत्युमुखी पडत असत; पण आता वैद्यकशास्त्रात झालेल्या प्रगतीमुळे साथीचे आजार नियंत्रणात आले आहेत. ६० ते ७० च्या दशकात घडून आलेल्या 'हरित क्रांती'मुळे अन्नधान्याचे उत्पादन इतके वाढले आहे, की यापुढे कोरडा दुष्काळ किंवा ओला दुष्काळ पडला, तरी अन्नधान्याच्या टंचाईमुळे लोक मृत्युमुखी पडणार नाहीत; पण विकसनशील आणि अविकसित देशांतील राज्यकर्त्यांचा शेती आणि शेतकरी यांच्याकडे पाहण्याचा

दृष्टिकोन जर बदलला नाही आणि शेती करणें म्हणजे स्वत:ची, तसेच राष्ट्राची प्रगती करण्याचा मार्ग आहे असे जर शेतकऱ्यांना वाटण्याइतपत विश्वासाचे वातावरण निर्माण झाले नाही तर येत्या वीस-पंचवीस वर्षांत भारतासारख्या देशातील शेतकऱ्यांचा शेती करण्याचा उत्साहच नाहीसा होईल आणि त्यामुळे होणारी अन्न-धान्याची टंचाई ही लोकांचे प्रमुख मरण कारण ठरण्याची शक्यता आहे.''

पंचवीस वर्षांपूर्वी डॉ. नॉर्मन बोरलॉग यांनी वर्तविलेली भविष्यवाणी अंशत: खरी ठरली. भारतीय शेतकऱ्यांचा शेती करण्याचा उत्साह काही मेला नाही; पण त्यांची जगण्याची उमेद मात्र संपून गेली. त्यामुळे अन्नधान्यटंचाईचा मुकाबला देशवासीयांना करण्याची वेळ न येता, शेतकऱ्यांवर मात्र जीव देण्याची वेळ आली. इथिओपिया, सोमालियातमात्र शेती, शेतकऱ्यांसह सारेच उद्ध्वस्त झाले. आज इंग्रजी वर्तमानपत्रं आणि नियतकालिकांतून विद्वान पत्रपंडित आणि विचारवंत ''भारतीय कृषिक्षेत्राला निश्चितच कोणत्यातरी असाध्य व्याधीने, मोठ्या समस्येने ग्रासले आहे,'' म्हणून टाहो फोडत आहेत. ती परिस्थिती खरोखरच एकाएकी आणि अचानकपणे उद्भवलेली आहे का?

स्वातंत्र्यपूर्व काळात, इंग्रज इथं येण्याच्या अगोदर शेती व्यवसाय हा शोषणमुक्त कधी नव्हताच. शेतीच्या शोषणाचा आणि शेतकऱ्यांच्या लुटीचा इतिहास, हा शेती व्यवसायाच्या सुरुवातीपासून ते आजतागायत जी मानवी प्रगती झाली, त्या सर्व वाटचालीइतकाच जुना आहे. इंग्रज इथे आले, तेच मुळात शेतीमालाच्या व्यापाराच्या हेतूने. फक्त जुन्या रानटी शोषणाच्या पद्धती मोडीत काढून त्यांनी केलेली लूट कुणाच्या नजरेत भरणार नाही, इतपत खुबीने केली. नवनव्या लुटण्याच्या पद्धती विकसित केल्या अणि त्या बदल्यात इथे कायदा आणि सुव्यवस्था निर्माण केली. इंग्रजांनी प्रस्थापित केलेल्या शांततेला दादाभाई नौरोजी यांनी 'रक्त शोषून घेतल्यामुळे माणूस प्रेतवत शांत पडून राहतो,' त्या शांततेची उपमा दिली होती. प्रतिकारशक्ती हरवून बसलेला चैतन्यहीन समाज निर्माण झाला होता.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आधुनिक समाजात कारखानदारीच्या तुलनेत शेती व्यवसाय दुर्लक्षित राहतो, हे लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या परिषदा भरवून त्यांना आर्थिक प्रश्नांसाठी संघटित होण्याचे आवाहन केले. खेड्यांतील शेतकरी व शहरांतील कामगार यांचे हितसंबंध एकच असल्यामुळे त्यांनी एकत्र येऊन प्रस्थापित आर्थिक परिस्थितीतील विरोधकांशी संघर्ष केला पाहिजे अशी भूमिका त्यांनी



मांडली. एका परीने पुढे चालून १९८० च्या दशकात शेतकरी संघटनेच्या आंदोलनांना सुरुवात झाल्यानंतर शरद जोशी यांनी 'इंडिया' विरुद्ध 'भारत' ही संकल्पना मांडली, तिचे सूतोवाच १९३२ मध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले होते.

महात्मा गांधींनी ज्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले, तो लढा मुख्यत: ग्रामस्वराज्याचा लढा होता; पण जसजसे स्वातंत्र्य दृष्टिपथात येऊ लागले तसतसे गांधीजी इथल्या राज्यकर्त्यांनाच एखाद्या अडगळीसारखे भासायला लागले. एकीकडे रशियन साम्यवादी क्रांतीने घातलेली भुरळ आणि दुसरीकडे इंग्लंड, अमेरिकेतील औद्योगिक क्रांतीनंतर तिथल्या समाजजीवनाने प्रगतिपथावर घेतलेली झेप या दोन्हींच्या आकर्षणातून स्वीकारली गेलेली मिश्र अर्थव्यवस्था आणि तिला कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेची दिली गेलेली जोड या साऱ्यांचा परिणाम शेतीचे अर्थकारण बिघडण्यात झाला.

स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनांद्वारे नियोजनपूर्वक आर्थिक विकासाची संकल्पना जेव्हा स्वीकारली गेली, तेव्हा 'कल्याणकारी राज्य' व्यवस्था हा त्या संकल्पनेचा पाया होता. देशाची औद्योगिक क्षेत्रात भरभराट करायची असेल तर इथल्या शेतकऱ्यांनी आणखी काही काळ त्याग केला पाहिजे, कळ सोसली पाहिजे, अशी भावना त्या वेळच्या पं. जवाहरलाल नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांसारख्या राष्ट्रपुरुषांची होती. स्वातंत्र्यचळवळीतील त्यांचे योगदान आणि राजकारणातील नि:स्पृह वावर यामुळे त्यांच्या नेतृत्वास प्राप्त झालेले देवत्व आणि त्यांच्यावरील देशवासीयांचा अगाध विश्वास, यामुळे हे राष्ट्रपुरुष जे काही करतील, ते देशाच्या भल्याचेच असणार याविषयी कुणी शंका घेणेदेखील महापाप समजले जात असे. महालनोबिस या कलकत्तास्थित संख्याशास्त्र संस्थेतील अर्थतज्ज्ञाचा झिरपण्याचा सिद्धांत (Percolation Theory) नियोजनाचा मुख्य गाभा बनला. रशियन राज्यक्रांतीने शेतीची मालकी असणाऱ्या प्रत्येकास उत्पादनसाधनांच्या मालकीच्या तत्त्वानुसार 'आहे रे' वर्गात बसविले आणि बिगर शेती असणाऱ्या घटकांना 'नाही रे' वर्गात घातले. स्टॅलिनने रशियातील संपूर्ण शेतीचे राष्ट्रीयीकरण करून, शेती मामूहिक मालकीची केली. तोच आदर्श जवाहरलाल नेहरूंपुढे होता. नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनात जवाहरलाल नेहरूंनी आपल्याही देशातील शेती सामूहिक मालकीची करण्याचा प्रस्ताव मांडला होता. त्या ठरावास चक्रवर्ती राजगोपालाचारी,

डॉ. पंजाबराव देशमुख आणि चौधरी चरणसिंग यांनी विरोध केला; म्हणून भारतातील शेती शेतकऱ्यांच्या वैयक्तिक मालकीची राहिली अन्यथा रशियातील शेतीचे आणि संपूर्ण देशाचेच जसे वाटोळे झाले, तसे आपल्या देशातही केव्हाच घडले असते; परंतु शेतीच्या राष्ट्रीयीकरणाचे संकट टाळण्यात यश आले तरीही शेतीमालाला उत्पादनखर्च भरून निघेल इतका भाव न देण्याचे धोरण मात्र चालूच राहिले. शेतीचा प्रश्न म्हणजे मुख्यतः जमिनीची असमान मालकी असा दृढ समज, त्यासाठी जमिनीच्या फेरवाटपाचा आग्रह. 'सिलिंग'चा कायदापण होता हे मुळात तोट्याचे कलम आहे, हे मान्य केले गेले नाही.

शेतीमालाला भाव मिळता कामा नये, कारण ते वाढले तर शेतीबाहेरील ग्राहकास ते भाव परवडणार नाहीत. कारखानदारीचा वेगाने विकास करायचा असेल तर शेतीमध्ये तयार झालेले वरकड (Surplus) उत्पादन हे कारखानदारीकडे वळवले पाहिजे, असे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या प्रास्ताविकात नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष व्ही.टी.कृष्णम्माचारी यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. कारखानदारीची भरभराट व्हावी, कारखान्यांत काम करणारे कामगार आणि इतर नोकरदार यांना अन्नधान्य आणि इतर शेती उत्पादने स्वस्त दरात मिळावीत, कारखान्यास लागणारा कच्चा माल स्वस्तात स्वस्त दराने मिळावा म्हणून शेतीमालाचे भाव सतत पाडण्याचे धोरण आखणे, हा त्या कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा मूळ गाभा होता.

या धोरणांचा पाठपुरावा जवळपास १९९०-९१ पर्यंत केंद्रात सत्तेवर येणाऱ्या प्रत्येक सरकारने केला. सरकारी नोकरदारांचे पगार तीनशे रुपयांवरून तीस हजार रुपयांपर्यंत गेले, तरी ते 'नाही रे' वर्गाचेच सदस्य राहिले आणि तीन एकर कोरडवाहू शेतीचा मालक कर्जबाजारी होऊन आत्महत्या करण्यापर्यंतच्या कडेलोटावर येऊन ठेपला, तरी तो 'आहे रे' वर्गाचा प्रतिनिधी !

जाणीवपूर्वक शेती हे तोट्याचे कलम राहील अशी अर्थव्यवस्था राबविण्यात येत आहे. शेतीची लूट हे सरकारचे अधिकृत धोरण आहे, हे वास्तव पहिल्यांदा १९८० च्या सुमारास शरद जोशी यांनी शेतकऱ्यांच्या लक्षात आणून दिले. सुरुवातीस कांदा, नंतर ऊस, तंबाखू, कापूस या पिकांच्या भावासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करून स्वातंत्र्यानंतरची सर्वांत लक्षवेधी आणि शेतकरी महिलांचादेखील व्यापक सहभाग असलेली मोठी चळवळ शेतकरी संघटनेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात उभी राहिली. सर्व जाती-जमाती, भाषा, धर्म, यांची बंधने तोडून, या



चळवळीने पंजाब, हरियाना, गुजरात, कर्नाटक या राज्यांपर्यंत व्यापक रूप धारण केले. महात्मा फुल्यांच्या नंतर इतक्या अभ्यासपूर्वक शेतकऱ्यांच्या आणि शेतकरी महिलांच्या प्रश्नांची मांडणी दुसऱ्या कोणत्याही जनआंदोलनास करता आली नाही. १९८० ते १९९० पर्यंतचे दशक या शेतकरी चळवळीने ढवळून काढले. सर्व अर्थशास्त्रीय सिद्धांतांची नव्याने मांडामांड करण्याची वेळ आली. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेसमोर प्रश्नचिन्ह उभे केले आणि त्याच वेळी म्हणजे सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी १९८० च्या सुमारासच शरद जोशींनी इशारा दिला होता, की ''आज जर शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सुटला नाही, तर उद्या शेतकऱ्यांच्या पोरांना पुण्या-मुंबईच्या फुटपाथवर जाऊन भीक मागण्याची वेळ येईल.'' सत्तास्थानी जाऊन बसलेल्या आणि बहुसंख्येने शेतकरी कुटुंबांतूनच गेलेल्या राज्यकर्त्यांना सांप्रती हा कोण 'बामण' शेतकऱ्यांची बाजू घेऊन लढण्याची भाषा करतोय, याचे आश्चर्य वाटू लागले. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यासंबंधी कुणाही जोशी, कुलकर्णी, दांडेकर यांनी आम्हांला शहाणपण शिकवायला बघू नये' अशी गुर्मीची भाषा सर्रासपणे वापरली गेली. प्रसारमाध्यमं आणि मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, शहरी उच्चभ्रू वर्गाची मतं अशी, की शेतकऱ्यांना आंदोलनं करायची गरजच कुठे आहे? सत्तेत तर सगळे तेच आहेत आणि ''आज शेतीमालाचा भाव मागत आहेत, उद्या आकाशातला चंद्र मागतील,'' ही भावना मुळात शेतीशी संबंध नसलेल्या आणि शहरी वातावरणात वाढलेल्या, दररोजच्या दैनंदिन जीवनात लागणाऱ्या दूध, फळे, भाजी-पाला, अन्नधान्य इत्यादी बाजारातून आणावे लागणाऱ्या मध्यमवर्गीय माणसाच्या मनात होती. शेती करणाऱ्या वर्गाबद्दल एक असूयेची भावना सुप्तमनात कायमचीच वसत असते. ''आपलं शहरी मध्यमवर्गीय जीवन किती सर्व प्रकारच्या बंधनांनी जखडलेलं, परावलंबी, प्रत्येक गोष्टीसाठी पावलोपावली पैसे मोजावे लागतात, याउलट शेतकऱ्यांचं जीवन किती सुखी? हवा, पाणी, जमीन या सर्व बाबी तर निसर्गतः त्यांना लाभलेल्याच आहेत. त्याकरिता पैसे मोजावे लागत नाहीत. राहता राहिला प्रश्न शारीरिक श्रमाचा, तर त्या श्रमामुळे तर त्यांचे आरोग्य किती सुदृढ राहतं? शुगर नाही, ब्लड प्रेशर नाही, हार्ट अटॅक नाही; मस्त मोकळी हवा, स्वच्छ सूर्यप्रकाश, रात्रीचं शीतल चांदणं, हर मोसमात बहरून येणारा शिवार, पक्ष्यांची गाणी, नदीनाल्यातून झुळझुळ वाहणारं पाणी. हां. आता हरितक्रांतीच्या नंतर थोडाबहुत खर्च वाढलेला असेल; पण त्यांना तो कोण करा म्हणतं? त्यांनी

आपली शेती नैसर्गिक पद्धतीनं करावी. मुलामुलींची लग्नं गावात मारुतीच्या पारावर कमीत कमी किंवा बिनखर्चातच करावीत. पोराबाळांना शिकवायचं असेल तर अशी कुठं त्यांची मुलं शिकूनसवरून दिवे लावणार आहेत? शेतीही हवी, शिक्षणही हवं, जमल्या तर नोकऱ्याही हव्यात म्हणजे अतीच झालं.'' अशी त्यांची सर्वसाधारण मानसिकता असते. त्यामुळे या वर्गाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याचा प्रश्नच येत नव्हता. नागरी समाजाची शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदनाविषयीची बधिरतादेखील बऱ्याच अंशी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत ठरली आहे.

१९८० मध्ये शेतकऱ्यांच्या पोरांच्या भवितव्याविषयी शरद जोशींनी वर्तविलेलं भविष्य मात्र खोटं ठरलं. जेव्हा शेतकऱ्यांच्या पोरावर फुटपाथवर जाऊन भीक मागण्याची वेळ येईल असं वाटलं, तेव्हा त्यांनी शेतातल्या बांधावरल्या झाडाला लटकून फाशी घेऊन जीव देणं पत्करलं. १९८६ मध्ये २३ मार्च रोजी यवतमाळ जिल्ह्यातील थेरगव्हाण येथील साहेबराव करपे या सुशिक्षित, गावपातळीवरील राजकारणात भाग घेतलेल्या आणि गावचं एकेकाळी नेतृत्व केलेल्या शेतकऱ्याने थकलेल्या वीज बिलापायी विद्युत मंडळाने कनेक्शन तोडले, पाण्याअभावी करपून चाललेलं पीक पाहवेना म्हणून सर्व कुटुंब घेऊन वर्ध्याला येऊन कुटुंबीयांसह विष पिऊन इहलोकाची यात्रा संपविली. त्याआधी आंध्र प्रदेशातील गोदावरी आणि प्रकाशम या अतिशय काळी कसदार जमीन असणाऱ्या भूप्रदेशातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्यास १९८४-८५ सालात सुरुवात केली. आज घडीपर्यंत (मार्च २००६ पर्यंत) महाराष्ट्रातील ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्यासंबंधी काही व्यक्ती आणि संस्थांनी अभ्यास केला आहे. या सर्व आत्महत्यांचा वेग वाढल्यानंतर २००४ साल संपता संपता ''दि ऑल इंडिया बायोडायनॅमिक ॲण्ड ऑर्गनिक फार्मिंग असोसिएशन'' या संस्थेने मुंबई उच्च न्यायालयास या आत्महत्यांची दखल घेण्यासंबंधी पत्र लिहिले. न्यायालयाने ते पत्रच याचिका म्हणून दाखल करून घेतले. आत्महत्यांसंबंधीची अद्ययावत माहिती अमरावतीहून प्रकाशित होणाऱ्या दैनिक देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे यांनी जमा केलेली आहे. त्यांनी न्यायालयास विनंती केली, की या प्रकरणात सहयाचिकाकर्ते म्हणून आपणांस या संबंधात बाजू मांडण्याची संधी द्यावी. न्यायालयाने तेही मान्य केले आणि टाटा समाजविज्ञान संस्थेस महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसंबंधी



अभ्यास करून आठ आठवड्यांत अहवाल न्यायालयास सादर करण्याचा आदेश दिला. या संस्थेच्या तुळजापूर येथील ग्रामीण केंद्राच्या वतीने प्रा. अजय दांडेकर, शहाजी नरवडे, राम राठोड, राजेश इंगळे, विजय कुलकर्णी व वाय.डी.सातप्पा यांच्या गटाने 'महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे' यासंबंधीचा आपला अहवाल १६ मार्च २००५ रोजी मुंबई उच्च न्यायालयास सादर केला. सुमारे दोन वर्षे या पत्ररूपी जनहित याचिकेवर सविस्तर सुनावणी झाली. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या न्यायाधीशांनी विविध आदेश व निर्देश देऊन ५ मे २००६ रोजी ही याचिका निकाली काढली. या सुनावणीच्या दरम्यान समोर आलेल्या माहितीच्या आधारे खंडपीठाने असे नमूद केले : ''शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची खरी कारणे लपविण्याची किंवा ती दडपण्याची सरकारी यंत्रणेची प्रवृत्ती दिसून येते.''

आता ही याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निकाली काढलेली असल्यामुळे सदर अहवाल काय होता, ते पाहायला हरकत नाही. वर्षवार आत्महत्यांचा तपशील तक्ता क्र.३ मध्ये दिलेला आहे.

१ मार्च २००१ ते ३१ डिसेंबर २००४ पर्यंत आत्महत्या केलेल्या एकूण ६४४ शेतकऱ्यांपैकी पाच टक्के म्हणजे ३६ घटना, टाटा समाज विज्ञान संस्थेने निवडल्या. सर्व ६४४ घटनांची नोंद घेतली; पण या ३६ घटनांचा खोलात जाऊन अभ्यास केला. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची यादी मुख्यतः अमरावती येथून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे यांच्याकडून प्राप्त झालेली आहे. तक्ता क्र. २ मध्ये विभागवार आत्महत्यांचा तपशील दिलेला आहे.

नंतरच्या १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २००५ या एकाच वर्षात ६४५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ज्या ३६ नमुना शेतकऱ्यांचा अभ्यास टाटा समाज विज्ञान संस्थेने केला आहे. त्यांचे सामाजिक (जातीनुसार) व शेतीच्या मालकीसंबंधीचे विवरण तक्ता क्र. ४ मध्ये दिलेले आहे.

लहान शेतकऱ्यांमध्ये अशिक्षितांचे प्रमाण सर्वाधिक (८६%) आहे. शिक्षितांमध्ये ७% भूमिहीन, ४१% लहान शेतकरी, २८% मध्यम शेतकरी आणि १४% मोठे शेतकरी आहेत. एकूण ३६ आत्महत्या केलेल्या व या अभ्यासाकरिता निवडलेल्या घटनांमधील १९% अशिक्षित असून, उर्वरित ८१% शिकलेले आहेत; पण यामध्ये उच्च शिक्षण घेतलेला एकही दिसत नाही. तसेच घरामध्ये कुणी छोट्या

मोठ्या का होईना; पण शासकीय, निमशासकीय किंवा खासगी क्षेत्रात नोकरीच्या निमित्ताने बाहेर पडलेलाही नाही. जातीनिहाय पाहिल्यास शिकलेल्यांमध्ये ७% अनुसूचित जातींचे, ३.५ टक्के अनुसूचित जमातींतील, ३५ टक्के इतर मागासवर्गीय, ७ टक्के भटक्या विमुक्त जातींतील तर ४८ टक्के खुल्या जात गटातील आहेत.

केवळ शेती की शेतीसोबत इतर काही उद्योग, व्यवसाय करणारे हे शेतकरी होते, याचाही अभ्यास या गटाने केलेला आहे. एकूण घटनांच्या १८ टक्के केवळ शेती व्यवसायावर अवलंबून होते. उर्वरित ८ टक्क्यांमध्ये ७० टक्के शेती आणि शेतमजुरी करणारे, १२ टक्के शेती आणि इतर कौशल्याची कामे करणारे, ३ टक्के शेती आणि दुधाचा व्यवसाय करणारे तर ६ टक्के छोटा व्यापार किंवा दुकानदारी करणारे होते.

या आत्महत्यासंदर्भात शासकीय यंत्रणेचा दृष्टिकोन कसा होता, या विषयीदेखील तपशील देण्यात आलेला आहे.

उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी दिलेल्या आदेशानुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसंबंधी माहिती मिळविण्यासाठी अनेक पत्रे आणि फॅक्स पाठवूनदेखील जालना व धुळे या दोन जिल्हाधिकाऱ्यांचा अपवाद वगळता इतर एकाही जिल्हाधिकारी किंवा अन्य प्रशासकीय यंत्रणा यांनी काहीच प्रतिसाद दिला नसल्याचे या अभ्यास गटाने नमूद केले आहे. दिलेल्या मुदतीत उच्च न्यायालयास अहवाल सादर करावयाचा असल्याने अन्य प्रशासकीय यंत्रणा उदा. विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त, कृषी सहसंचालक, कृषी उत्पादनखर्च समिती यांच्याकडून अभ्यास गटास माहिती मिळवावी लागली. शासकीय यंत्रणेने दिलेली माहिती आणि अभ्यासगटाने शोधून काढलेली माहिती यांतील तफावतीवर न्यायालयानेदेखील नाराजी व्यक्त करावी आणि आत्महत्यांची खरी कारणे दडवून ठेवण्याकडेच किंवा खोटी कारणे नमूद करण्याकडेच शासकीय यंत्रणेचा कल असल्याचे न्यायालयाने निदर्शनास आणावे, यावरून शासकीय यंत्रणेची या संपूर्ण प्रक्रियेकडे पाहण्याची मनोवृत्ती दिसून येते.

टाटा समाज विज्ञान संस्थेने केलेल्या अभ्यासातून प्रामुख्याने ज्या बाबी समोर आलेल्या आहेत, त्या अशा :

आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये कोरडवाहू कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. महाराष्ट्रातील इतर अनेक जिल्ह्यांत शेतकरी आत्महत्या



करीत असले, तरी सुरुवातीपासून यवतमाळ जिल्ह्यात हे प्रमाण सर्वाधिक आहे. २००० सालापासून आत्महत्या करणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. आत्महत्या करणाऱ्यांमध्ये सर्वच जातीजमातींचे शेतकरी आहेत; पण सवर्ण शेतकऱ्यांचे प्रमाण तुलनेने सर्वाधिक (४८ टक्के) आहे.

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी ५० टक्के शेतकरी ५ एकरांपेक्षा कमी कोरडवाहू शेती करणारे आहेत; तर ३० टक्के ५ ते १५ एकर दरम्यान कोरडवाहू शेतीचे मालक आहेत. ७० % घटनांमध्ये स्वत:ची अल्प जमीन व दुसऱ्याकडे मजूर म्हणून काम करणारे शेतकरी आहेत. १९ टक्के पूर्ण अशिक्षित तर ८१ टक्के अक्षर-ओळख ते दहावीपर्यंत शिक्षण घेतलेले आहेत. बहुतेक शेतकऱ्यांकडील कर्ज (आत्महत्या केलेल्या) एक लाखाच्या आत आहे आणि बहुसंख्य शेतकऱ्यांनी ते विविध बँकांकडून घेतलेले आहे. खासगी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची आणि त्यामुळे घडून आलेल्या आत्महत्यांची प्रकरणे कमी आहेत. काही घटनांमध्ये तर कर्ज कोणतेच नाही; पण आर्थिक ओढाताण आणि सातत्याने बुडणारे पीक किंवा मुलीच्या लग्नाच्या खर्चाचा ताण असह्य होऊन केलेली आत्महत्या अशा घटना आहेत.

वरील अहवालामुळे एक बाब प्रामुख्याने समोर आणली, ती म्हणजे शेतकरी आत्महत्या करीत आहेत, ती मुख्यत: कर्जबाजारीपणामुळे. अवर्षण, पीक बुडणे, दुबार पेरणीचे संकट, मुलीचे लग्न ही इतर कारणे; पण हा कर्जबाजारीपणा आला कसा? आणि अवर्षण, पीक बुडणे, दुबार पेरणी, मुलीचे लग्न यांची धास्ती घेऊन आत्महत्या करण्याचे टोकाचे पाऊल उचलण्याइतपत हतबलता शेतकऱ्यांमध्ये का आली ? याच्या कारणांचा शोध या अहवालात नाही. तो त्याबाबत अभ्यास करणाऱ्या गटाच्या उद्दिष्टातही नसावा. तक्ता क्र. ८ मध्ये इ.स. २००१-२००२, २००२-२००३ आणि २००३-२००४ या तीन वर्षांकरिता महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या कृषी उत्पादनखर्च यंत्रणेने काढलेल्या आणि केंद्र सरकारकडे शिफारस केलेल्या प्रमुख तेरा पिकांच्या किमती आणि केंद्र शासनाने निश्चित केलेल्या किमती दर्शविलेल्या आहेत. राज्य शासनाची शेतीमालाचा उत्पादनखर्च काढण्याची पद्धत काही निर्दोष आणि आदर्श नाही; पण तरीही सुचविलेली किंमत आणि निश्चित केलेली किंमत यामध्ये जवळपास ४० ते ५० टक्क्यांचा फरक आहे. पुन्हा सुचविलेली किंमत म्हणजे त्यासंबंधी राज्य शासनाचा त्या किमतीबाबत फार आग्रह

असतो असे नाही आणि निश्चित केलेल्या किमतीने शेतीमालाची खरेदी करण्यासाठी केंद्र शासन किंवा राज्य शासन कुठली यंत्रणा राबविते, असेही नाही. केवळ उत्तर भारतातील पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेश या राज्यांतील गहू आणि तांदूळ या किमान दराने खरेदी करून साठविले जातात. इतर पिकांबाबत आनंद आहे! अधूनमधून परदेशांतून वेगवेगळ्या शेतीमालाची आयात करून अंतर्गत बाजारपेठेतील शेतीमालाचे भाव किमान किमतीच्या वर चढू नयेत, याची काळजी घेतली जाते. म्हणजे शेतीमालाच्या अपुऱ्या किमतीचा प्रश्न हाच शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणास आणि आर्थिक हतबलतेस कारणीभूत आहे, हा वारंवार सिद्ध झालेला मुद्दा जशास तसाच राहतो. त्याविषयी कुणीच काही बोलत नाही आणि काही करीतही नाही.

आज काही लोक व विशेषत: ज्यांना डाव्या विचारसरणीचे म्हणून संबोधले जाते, ते समाजवादी, सर्वोदयाची विचारसरणी मानणारे काही जण असं मोघमपणे मानतात, की शेतकऱ्यांच्या आत्महत्या या अर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेमुळे घडून येत आहेत. तेव्हा स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंतच्या जवळपास साठ वर्षांच्या कालखंडात शेतीमालास उत्पादनखर्च भरून निघेल इतके भाव दिले जात नाहीत आणि ते मिळू नयेत, हे सरकारचे अधिकृत धोरण आहे आणि याच धोरणाचा आपणही आजपर्यंत पाठपुरावा करीत आलो आणि आजदेखील करीत आहोत, हे जाणीवपूर्वक विसरतात. याउलट राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी जे राजकीय पक्ष आणि संघटना देव, धर्म, जात, पंथ यांचा वापर करतात, ते शेतकऱ्यांबाबत नीट विचार करतात असे चुकूनदेखील घडत नाही.

एकूण अर्थकारणच त्यांच्या दृष्टीने गौण बाब ठरते. ज्या ज्या वेळी शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न धसास लागण्याची वेळ आली, तेव्हा तेव्हा कधी रामजन्मभूमी तर कधी गोध्रा कांडाचे निमित्त करून धार्मिक उन्मादाचे वातावरण ज्यांनी निर्माण केले, ते पक्ष आणि संघटना ही शेतकऱ्यांच्या तेवढ्याच गुन्हेगार आहेत. लोकांचे वर्तमान काळातील आणि भविष्यकाळातील महत्त्वाचे प्रश्न अडगळीत पडावेत आणि त्यांनी सतत भूतकाळातील गतवैभवावर झुलत राहावं, अशा क्लृप्त्या योजण्यात वाक्बगार असणारे राजकारणीही शेतकऱ्यांचा घात करण्यास कारणीभूत ठरलेले आहेत.

आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर आणि भारताने डंकेल प्रस्ताव



स्वीकारून गॅट करार कान्य केला, तेव्हा १९८६-८९ या वर्षांसाठी जागतिक व्यापार संघटनेने सगळ्या देशांकडून आकडेवारी मागवली, की तुमच्या देशातील शेतकऱ्यांना शेतीमालाला उत्पादनखर्चाच्या तुलनेत काय भाव मिळतात? जपानने सांगितले, की १०० रुपये उत्पादनखर्च असेल तर आमच्या शेतकऱ्याला १९० रुपये मिळतात. युरोपातील देशांत १६५ रुपये तर अमेरिकेतील शेतकऱ्याला १३५ रुपये मिळतात. १९८६ मध्ये त्या वेळचे व्यापारमंत्री प्रणव मुखर्जी यांच्या सहीने भारत सरकारने जागतिक व्यापार संस्थेला सांगितले, की आमच्या शेतकऱ्याचा उत्पादनखर्च १७२ रुपये असेल तर आम्ही त्यास १०० रुपयेच देतो. सगळ्यां प्रगत देशांत, शेतकऱ्यांचा फायदा व्हावा असे धोरण आणि आपल्या देशात मात्र त्याचे नुकसान व्हावे असे धोरण! यालाच शरद जोशींनी 'उणे सबसिडी' हा शब्द वापरला. तो नुसता उच्चारला तरी अनेक शेतकऱ्यांविषयी खोटा कळवळा दाखविणाऱ्या आणि आर्थिक धोरणे तयार करणाऱ्या सरकारी विद्वान अर्थतज्ज्ञांचा मस्तक-शूळ उठतो. 'उणे सबसिडी' या शब्दाची खिल्ली उडविण्याची जणू स्पर्धा चालते. आज संपूर्ण देशातील सर्व शेतकऱ्यांकडे मुद्दल, व्याज, चक्रवाढ व्याज, दंडव्याज या सर्वांसह थकलेले कर्ज ३३ हजार कोटींच्या आसपास आहे; तर दुसऱ्या बाजूला १९८० ते २००० या दोन दशकांतील उणे सबसिडीच्या धोरणांमुळे १८ प्रमुख पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांची लूट ३ लाख कोटी रुपयांची झाली आहे. सरकार शेतकऱ्यांना वीज स्वस्त देते, कर्जावरील व्याजाचे दर कमी ठेवते, खतांच्या किमती, सिंचनाच्या सुविधा यांवर सबसिडी देते. या सर्वांची गोळाबेरीज २८ हजार कोटी रुपये इतकीच होते. म्हणजे ३ लाख कोटी रुपयांना शेतकऱ्याला बुडविल्यावर, ३३ हजार कोटींच्या थकबाकीसाठी सरकारच्या आधिपत्याखालील बँका आणि सोसायट्या या वसुलीचा तगादा शेतकऱ्यांच्या पाठी लावणार, त्यापायी शेतकरी आत्महत्यांचा मार्ग पत्करणार आणि वरून सरकार या आत्महत्या होऊ नयेत म्हणून हजार पाचशे कोटींचे पॅकेज जाहीर करणार! ज्यांनी जीव दिला त्यांच्या कुटुंबीयांना लाख रुपये मिळाले म्हणून जो जीव देण्याच्या वाटेवर आहे, तो थोडाच थांबणार आहे? संपूर्ण शासकीय यंत्रणाच जर शेतकऱ्यांची गुन्हेगार असेल तर ती शेतकऱ्यांना योग्य न्याय देऊ शकेल का? आणि शेतकरी या अरिष्टातून बाहेर येऊन सन्मानाने जगावा असे राज्यकर्त्यांना वाटेल का?

१९८९ मध्ये केंद्रात व्ही.पी. सिंगांचे सरकार होते. लालकृष्ण अडवाणी यांनी

रामजन्मभूमीच्या प्रश्नावर काढलेल्या रथयात्रेस शह देण्याच्या राजकारणाचा भाग म्हणून व्ही.पी. सिंगांनी मंडल आयोग लागू करण्याचे ठरविले. त्यास विरोध म्हणून नवी दिल्ली येथे विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. राजीव गोस्वामी या विद्यार्थ्याने स्वत:ला पेटवून घेऊन जीव देण्याचा प्रयत्न केला. पुढे रथयात्रा अडविल्याचे निमित्त साधून भाजपने केंद्रसरकारचा पाठिंबा काढून घेत असल्याचे जाहीर केले आणि दीड वर्षाच्या आत व्ही.पी.सिंगांचे सरकार कोसळले. प्रसारमाध्यमे आणि देशातील एकूणच जनमत राजीव गोस्वामी या विद्यार्थ्याच्या कृतीबाबत जेवढ्या प्रमाणात संवेदनशील असल्याचे दिसले, तेवढी संवेदनशीलता हजारोंच्या संख्येने आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांबाबत दिसली नाही. या घटनांमुळे ना कुठले सरकार कोसळले ना कुठल्या विधिमंडळावर वा संसदेवर कुणी हल्ला केला. स्वत: होऊन या आत्महत्यांची दखल घेण्याइतपत संवेदनशीलताही राज्यकर्ते दाखवू शकले नाहीत.

उलट कौटुंबिक कलह, अतिमद्यपान, जुनाट आजार (अगदी एड्सदेखील) मानसिक संतुलन बिघडणे या कारणांसोबत खासगी सावकाराकडून घेतलेले कर्ज याच बाबी प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्यांस कारणीभूत आहेत, असेच वारंवार शासनकर्ते नमूद करीत होते. आता कुठे कर्जबाजारीपणामुळेच आत्महत्या घडून येत आहेत, हे मान्य करण्यात येत आहे; पण हा कर्जबाजारीपणा कशामुळे आला याची वाच्यता कुणी करीत नाही. जणू शेतकऱ्यांनाच कर्जबाजारी होण्याची हौस आहे आणि त्यांच्या मूर्खपणामुळेच ते मरत आहेत असा आभास निर्माण करण्यात येत आहे.

वास्तवात शेतकरी कर्जबाजारी होण्याची प्रक्रिया सुरू केली ती राज्यकर्त्यांनी. देशातील सर्व लोकांची अन्नधान्याची गरज भागवायची तर अधिक उत्पादन व्हायला हवे म्हणून शेतकऱ्यांना "Grow More Food Campaign" राबवून उत्पादन वाढवायला पर्यायाने शेतीतील खर्च वाढवायला भाग पाडण्यात आले. तेव्हापासून पुढे १९६३-६४ सालादरम्यान गव्हाच्या, तांदळाच्या बुटक्या जाती, ज्वारी आणि कापसाचे संकरित वाण यांच्या निर्मितीमुळे 'हरित क्रांती' अवतरली. या दोन्ही घटनामुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला; पण ही 'हरित क्रांती' शेतकऱ्यांच्या मुळावर आली. जगाचे पोट भरण्याची काळजी घेता घेता, स्वत: पोषणकर्त्यावर मात्र उपाशी राहण्याची आणि वाढता खर्च भागवता भागवता, कर्जबाजारी होण्याची आणि शेवटी ते कर्ज दिसामासी वेडेवाकडे वाढत जाण्याने



स्वत:च जीव देण्याची वेळ आली.

शेतकरीदेखील एखाद्या जुगाऱ्याच्या कैफात हा सतत हरणारा डाव पुन्हा पुन्हा सर्वस्व पणाला लावून खेळत राहिला. रासायनिक खते, कीटकनाशके, जंतुनाशके, बाजारात येणारे नवनवीन महागडे बियाणे, सिंचनाची सोय व्हावी म्हणून विहिरी खोदणे, विंधन विहिरी, सबमर्सिबल पंप, पाईप लाईन इत्यादीसाठी लागणारा खर्च योग्य किमतीच्या अभावी शेतीमालाच्या विक्रीतून भागविता आला नाही. त्याकरिता अवाच्या सवा व्याजदाराने कर्ज काढणे. हे कर्ज मुख्यत: सहकारी बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका व राष्ट्रीयीकृत बँकांचे आहे. ट्रॅक्टर, विहीर, मोटार, पाईपलाईन इत्यादी बाबींसाठी मध्यम किंवा दीर्घ मुदतीचे कर्ज बँकांकडूनच घेतले जाते. राज्यकर्ते जसे सांगतात- खासगी सावकाराकडील कर्जामुळे शेतकरी आत्महत्या करतात, हे खरे नाही. खासगी सावकारांचा वाटा यात फार कमी आहे. शेतकरी खासगी सावकारांकडून कर्ज घेतो, ते मुख्यत: कौटुंबिक अडचणीच्या वेळी, मुलीचे लग्न, घरात कुणी आजारी पडलं असेल तर आणि शेतीतील नैमित्तिक खर्च भागविण्यासाठी. हे कर्ज फार काळ थकविता येत नाही. कर्ज थकते ते मुख्यत: बँकांचेच आणि त्यांच्या व्याजआकारणीच्या पठाणी पद्धतीने भरमसाट वाढत जाते आणि जप्तीसारखे, लिलावासारखे प्रकार, सार्वजनिक स्वरूपाची मानहानी करण्याचे प्रकार मुख्यत: बँकांकडूनच अवलंबिले जातात आणि या मानहानीच्या भीतीपोटीच शेतकरी बहुतेक वेळा जीव देण्यापर्यंतचे टोकाचे पाऊल उचलतात.

आज शेतकऱ्याकडे असणाऱ्या सरासरी शेतीचा आकार साडेतीन एकर आहे. ती प्रामुख्याने कोरडवाहू आहे. महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतीतील प्रतिहेक्टर कापसाचे उत्पादन केवळ ३८३ कि.ग्रॅ. आहे. उच्चप्रतीच्या कापसाला मिळणारा सर्वोच्च भाव २५००/- रुपये ते ३०००/- रु. मिळाला तरीही या कुटुंबास वर्षाकाठी १०,०००/- रुपयांच्या वर उत्पन्न (खर्चाचा विचार न करता) मिळू शकत नाही. अशी बहुसंख्य (७२%) कुटुंबे अर्धवेळ मजुरी करतात आणि शेतमजुरीतून आलेली कमाई या कापसाच्या किंवा अन्य कोणत्याही पिकाच्या उत्पादनाकरिता येणारा तोटा भरून काढण्यासाठी वापरतात. कदाचित या कुटुंबाकडे शेतीच नसती तर कमवून आणलेली मजुरी तर त्याच्या उपजीविकेसाठी वापरता आली असती. साडेतीन एकर कोरडवाहू शेती हे काही एका कुटुंबाच्या उपजीविकेचे साधन होऊ शकत नाही.

आजघडीला जे आत्महत्यांचे सत्र सुरू आहे, त्यातून भविष्यात काय घडू शकेल? शासन आज आत्महत्या थांबाव्यात म्हणून ज्या उपाययोजना करीत आहे, त्या खरेच आत्महत्या थांबविण्यास उपयोगी ठरणार आहेत का? १० डिसेंबर २००५ रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी विदर्भातील सहा जिल्ह्यांसाठी १०७५ कोटी रुपयांच्या मदतीचे 'पॅकेज' जाहीर केले आणि त्या पुढील तीन महिन्यांत एकट्या विदर्भात साडेतीनशे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्याआधीच्या आत्महत्यांपेक्षा या आत्महत्यांचा वेग तीन पटींनी अधिक आहे. चार ते सहा टक्के व्याजदराने शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याची दुसरी घोषणा शासनाने केली आहे आणि मृतांच्या नातेवाइकांना एक लाख रुपयांची मदत.

आत्महत्यांचे मूळ कारण शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आहे. कर्जबाजारीपणा शेतीमालाचे भाव जाणीवपूर्वक कमी ठेवण्यामुळे आलेला आहे, या बाबी स्पष्ट असताना, या दोहोंबाबत काहीच न करता वरवरच्या उपाययोजनांमुळे आत्महत्या कशा थांबतील? जगात आजपर्यंत कुठलेही मृत्यू मोबदला दिल्याने थांबले नाहीत. ज्या कारणामुळे असे अकाली मृत्यू ओढवतात, ती कारणं नष्ट केल्यानेच ते थांबविता येतात, हे न कळण्याइतपत राज्यकर्ते खुळे नाहीत.

कमी भाव देण्याचे आणि शेती व्यवसाय तोट्यात ठेवण्याचे धोरण सरकार स्वत: होऊन बदलण्याची सूतराम शक्यता नाही. तसेच शेतकऱ्यांच्या डोक्यावर असलेले कर्ज कितीही अनैतिक असले, तरीही ते माफ करण्याचा निर्णयही घेणे शक्य नाही. मिश्रव्यवस्थेपोटी जन्माला आलेल्या या विद्रूप जखमा सहजासहजी भरून येणाऱ्या नाहीत. ही वैगुण्ये तशीच ठेवून पुन्हा आहे त्याच यंत्रणेमार्फत ग्रामीण भागातील सहकारी पतसंस्था आणि सहकारी बँकांमार्फत वित्तपुरवठा करून शेती व्यवसाय जिवंत ठेवणे म्हणजे या यंत्रणेत वाढलेली पिलावळ पोसण्यासाठीची केवळ तरतूद आहे. डॉ. दत्ता सामंत यांनी मुंबईच्या कापड गिरणी कामगारांचा संप पंधरा-वीस वर्षांपूर्वी घडवून आणला. तो पुढे कधीच मिटला नाही. गिरण्या कायमच्या बंद पडल्या आणि कामगार देशोधडीस लागले. तीच गत शेतकऱ्यांकडील कर्जाची आणि शेतीची आज झालेली आहे.

''थोड्याच काळात या जुलुमाचा परिणाम फार भयंकर होणार आहे, असे आमच्या ऐषआरामी उधळ्या सरकारच्या कानात सांगतो,'' म्हणून म. जोतिबा फुल्यांना सव्वाशे वर्षे झाली, तरी त्या परिणामांची तमा ना तेव्हाच्या गोऱ्या इंग्रज



सरकाने बाळगली ना आजचे आपले नेटिव्हांचे काळे सरकार बाळगणार आहे!

या सर्व अन्याय, अत्याचार याने गांजलेला शेतकरी एके दिवशी पेटून उठेल आणि आपल्यावरील अन्यायाचा जाब सरकारला विचारील, अशी एक भाबडी आशा काही जण मनात बाळगतात; पण जगात आजपर्यंत अशा अन्याय पीडितांनी उठाव केल्याचे दाखले फारसे नाहीत. नाही पेक्षा आज फाशी घेऊन आत्महत्या करणारे शेतकरी केव्हाच पेटून उठले असते, तर शरद जोशींनी शेतीमालाच्या भावासाठी सुरू केलेला लढा केव्हाच यशस्वी झाला असता आणि आज शेतकऱ्यांवर जीव देण्याची वेळही आली नसती; पण हे घडले नाही. आज महात्मा गांधी हयात असते तर या आत्महत्या करण्याचा मार्ग अवलंबिलेल्या शेतकऱ्यांना त्यांनी ''या भेकडपणापेक्षा तुम्ही हिंसाचार केला असता, तरीही मी मान्य केले असते,'' असा सल्ला दिला असता.

आयुष्यभर अपयश आणि अपयशच, पदोपदी आर्थिक कुचंबणा, अवमान, अपमान हेच जिणं वाट्याला आलेला शेतकरी मनाने आधी मेलेला असतो. ''आम्ही काय मरून पडलेली माणसं,'' हा त्याचा परवलीचा शब्द. अन्यायाचा प्रतिकार करण्याइतपत जाण नसलेला माणूस इतरांना मारण्यापेक्षा मरणेच पत्करतो. संपूर्ण प्रशासन, पोलिस, न्याय व्यवस्था त्याच्या विरोधात असताना तो लढण्याचं धाडस तरी कुठून करेल? याचा अर्थ या आत्महत्यांचे सत्र असेच चालू राहून बहुतेक शेतकरी जीव गमावून बसतील का? तर हे असेही घडत नसते. आणखी काही काळ ही प्रक्रिया अशीच सुरू राहील; पण त्यातूनही काही मार्ग दिसू लागतील.

ज्युलियन सायमन या अमेरिकी अर्थतज्ज्ञाने (निधन १९९८) म्हटले आहे, ''माणसाची सतत प्रगतीच होत राहते. या पृथ्वीवरील सर्वांत निर्णायक साधन संपत्ती माणूस ही आहे. तो आपले मन, विचारशक्ती, प्रज्ञा, प्रतिभा वापरून सतत परिस्थितीवर मात करीत असतो. आपल्या प्रगतीच्या मार्गात येणारे सर्व अडथळे दूर करतो. त्याला खरी गरज फक्त एकाच गोष्टीची असते, ती म्हणजे स्वातंत्र्याची. राष्ट्राची प्रगती, त्यातील नागरिकांच्या स्वातंत्र्याशी सरळ जोडलेली आहे.''

साऱ्या पृथ्वीतलावर आतापर्यंत जेथे जेथे व्यक्तीचे स्वातंत्र्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानले गेले, तेथे प्रगती झाली. फक्त राष्ट्र, धर्म, देव, एखादी विशिष्ट विचारसरणी अशा नावाखाली हुकूमशाही लादली गेली, नागरिकांच्या स्वातंत्र्यावर बंधने आली; तेथे मात्र प्रगतीचे चक्र मंदावले, थांबले आणि काही वेळा उलटही फिरू लागले.

आज जग सारे प्रगतिपथावर आहे. चीनसारखा देश महासत्ता बनण्याची अभिलाषा बाळगतोय. भारतातीलदेखील शेतीवगळता इतर क्षेत्रांची प्रगती वेगाने होत आहे. विशेषत: ज्या ज्या क्षेत्रात सरकारी हस्तक्षेप नाही ती क्षेत्रे झपाट्याने प्रगती करीत आहेत. शेतीमात्र सततच्या सरकारी हस्तक्षेपामुळे अरिष्टात सापडली आहे.

आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया बरी की वाईट, हे काळ ठरवेल; पण या प्रक्रियेमुळे शेती व्यवसाय बंधनमुक्त होणार असेल, इतर क्षेत्रातील स्वातंत्र्याचे वारे याही क्षेत्रात येणार असतील तरच शेतीची आणि शेतकऱ्यांची प्रगती होणार आहे; पण बदलत्या परिस्थितीत शेती ही तोट्याचे कलम होती, आहे तोपर्यंतच ती शेतकऱ्यांच्या मालकीची राहणार आहे. एकदा का ती फायद्याचे कलम झाली, की ती केवळ शेतकऱ्यांच्याच मालकीची राहणार नाही. ज्यांच्याकडे उद्यमशीलता आहे, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेविषयी माहिती आहे आणि त्या स्पर्धेत टिकून राहण्याचा आत्मविश्वास आहे असेच शेतकरी उद्या शेती व्यवसायात टिकून राहतील. बाकीचे सर्व जण त्या व्यवसायातून बाहेर फेकले जातील. ही प्रक्रिया जगभर जिथे जिथे प्रगती झाली, तिथे सर्वत्र घडलेली आहे. आज अमेरिकेत केवळ १.६ टक्केच लोक शेती करतात. तिथली शेती भारतातल्या सारखी दर वर्षी आणि दर हंगामात केली जात नाही. चारपाच वर्षांतून एकदाच एखादे पीक घेऊन इतर वर्षांत तिथला शेतकरी आपले उद्योग करीत राहतो. एका राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार भारतातील ४४ टक्के शेतकऱ्यांनी योग्य पर्याय उपलब्ध झाल्यास शेतीतून बाहेर पडण्याची तयारी दर्शविलेली आहे. नवीन प्रस्तावित राष्ट्रीय कृषी धोरण ठरविण्यासाठी जी समिती केंद्र सरकारने स्थापन केली आहे, त्या समितीचे प्रमुख डॉ. एम.एस.स्वामीनाथन यांनी ही बाबीस दुजोरा दिला आहे. सरासरी प्रत्येक कुटुंबातील शेतीची मालकी ३.५ एकर शेतीवर अवलंबून असलेली ११.२४ टक्के कुटुंबे भूमिहीन तर २८ टक्के कुटुंबे केवळ अडीच एकर जमिनीचे मालक. ही वस्तुस्थितीही स्वामिनाथन समितीने पुढे आणली आहे. या परिस्थितीत बहुसंख्य शेतकऱ्यांना शेतीतून बाहेर पडण्याशिवाय गत्यंतर नाही. केवळ २५ ते ३० टक्के लोक शेती व्यवसायात राहिले आणि उर्वरित ३५ ते ४० टक्के लोक बाहेर पडले तर आणि बाहेर पडलेल्यांना शेती शिवाय इतर उद्योग, व्यवसाय रोजगार यामध्ये सामावले जाण्याची संधी मिळाली तरच हे अरिष्ट टळणार आहे.



एकेकाळी दलित समाजात जन्मलेल्या आणि खेड्यातील जातींच्या उतरंडीच्या समाजरचनेत पिचून गेलेल्या आणि जनावरांचे जिणे वाट्याला आलेल्या समाजगटास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ''दु:ख, दारिद्र्य, दैन्य, अन्याय, अज्ञान, अत्याचार यांनी सडलेल्या डबक्याची अवकळा आलेली खेडी सोडा,'' असा आदेश दिला होता. सर्व दलित समाजाने काही तो आग्रह मानला नाही; पण ज्यांनी मानला, त्यांची प्रगतीच झाली. आज तेव्हाच्या दलितापेक्षाही अधिक अवहेलनेचे जिणे शेती करणाऱ्या माणसांच्या वाट्याला आलेले आहे, तेव्हा आपल्या जगण्याच्या मुळावर उठलेला शेती व्यवसाय सोडून, इतर कोणत्याही व्यवसायाची कास धरण्याचा पर्याय शेतकऱ्यांसमोर उपलब्ध झाला, तर तो शेतीत राहणार नाही.

३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसेने गांधीजींची गोळ्या झाडून हत्या केली. त्या घटनेची प्रतिक्रिया म्हणून पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गावांत ब्राह्मणांची घरं जाळण्यात आली. त्या घटनेचा परिणाम म्हणून अनेक ब्राह्मण कुटुंबानी आपली वतनाची गावं सोडली. शेतीवाडी विकून टाकली. दोन पिढ्यांनंतरची त्यांची भरभराट डोळे दिपविणारी आहे. जे शेतीतच राहिले, त्यांच्या जगण्याला भयंकर अवकळा आली. जिथे शेती करण्यास निसर्ग प्रतिकूल आहे, शेतजमिनी हलक्या आहेत, त्या परिसरातून शेतीतून बाहेर पडण्याची आणि जीवनात इतर क्षेत्र निवडण्याची प्रक्रिया अधिक मोठ्या प्रमाणात घडली आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात 'लातूर पॅटर्न' निर्माण झाला आणि लातूर-बीड-उस्मानाबाद या जिल्ह्यांतील ओसाड, दुष्काळी प्रदेशांतील मुलं-मुली लक्षणीय प्रमाणात उच्च गुणवत्ता प्राप्त करून मेडिकल, इंजिनिअरिंगला प्रवेशपात्र ठरू लागली. स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने बहुसंख्य यशस्वी होणारे उमेदवार बीड जिल्ह्यातील असतात. कोकणातील शेतीयोग्य जमिनीचा भाव, अत्यल्प जमीनधारणा यामुळे पुण्या, मुंबईकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर कोकणपट्टीतून झाले. एकेकाळचा मुंबईतील चाकरमान्या, आज त्यांची मुलं, मुली उद्योग, व्यवसाय, माहिती-तंत्रज्ञान, व्यवस्थापन या क्षेत्रांत आघाडीवर आहेत.

'यवतमाळचे दुखणे' नावाचा एक लेख २००४ मध्ये शरद जोशींनी शेतकरी संघटनेचे मुखपत्र असलेल्या 'शेतकरी संघटक' या पाक्षिकात लिहिला आहे. ''यवतमाळ जिल्ह्याची विशेष भौगोलिक रचना, उच्च प्रतीची जमीन. पावसाची

अनुकूलता, एकेकाळी मोठा असणारा शेतजमिनीचा आकार यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीच्या आसपास बऱ्यापैकी सुखी समाधानी असणारा शेतकरी इतर प्रतिकूल परिस्थितीशी सदैव झगडा देणाऱ्या शेतकऱ्यांपेक्षा भाग्यवान ठरला. आणि पुढे प्रतिकूल परिस्थिती उद्‌भवल्यानंतर फारशा संघर्षाची सवय नसल्याने सर्वांगाने कोलमडून पडला,'' असे त्यात म्हटले आहे. भंडारा, गडचिरोली, नंदुरबार, बीड जिल्ह्यांतील पाटोदा, उस्मानाबादमधील परांडा, भूम, तुळजापूर, साताऱ्यातील माण, आटपाडी, येथे खरे तर आत्महत्या अधिक व्हायला हव्यात; पण असे न घडता तुलनेने संपन्न निसर्गाचे वरदान लाभलेल्या विदर्भात आज त्या अधिक घडत आहेत. याचा अर्थ शेतकऱ्यांमधील विकसित न होऊ शकलेल्या उद्यमशीलतेतही त्यांच्या आत्महत्येचे कारण शोधणे आवश्यक आहे.

शेतीतून ३०-४० टक्के लोक बाहेर पडण्याची प्रक्रिया सहज घडून येणारी नाही. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी ८० टक्के लोक शेतीत होते. ६० वर्षांनंतर ६५ टक्के लोक आहेत. १५ टक्क्यांचे स्थलांतर व्हायला लागलेला कालावधी पाहता हा वेळ लक्षात यावा; पण या पुढे ही प्रक्रिया वेगाने घडेल. शेतीतून बाहेर पडण्याची प्रक्रियाही जीव देण्यापेक्षाही अधिक जिकिरीची प्रक्रिया आहे. आई किंवा पोटचे मूल यापेक्षाही अधिक प्रेम, शेती करणारा माणूस शेतीवर करतो. त्याच्या याच अघोरी प्रेमाचा गैरफायदा घेत त्याला शेतीमध्येच अडकवून ठेवण्याचे कट आजवर यशस्वी होत आले. ज्यांनी शेतीचं सतत उदात्तीकरण केलं, तिथल्या जीवनशैलीचं कौतुक केलं, त्यांनी कधी स्वत: शेती केली नाही. आज शेतकरी शेती विकून बाहेर पडायचा विचार करायला लागला, तरीही शेती विकत घ्यायला कोण पुढे येईल हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. कारण ती आजही मोठ्या प्रमाणावर तोट्यातच आहे. उद्या खरोखर आर्थिक उदारीकरणाच्या परिणामी शेती फायद्याची झाली, तर मात्र मोठ्या प्रमाणावर शेतीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार व्हायला लागतील. नैसर्गिक बाजार नियमांचे फायदे शेती क्षेत्राला मिळू लागतील, तेव्हा उद्योग आणि व्यापार क्षेत्रातील लोकदेखील शेतीकडे वळतील आणि ज्यांना शेती नकोशी झाली आहे, ते लोक शेतीतून बाहेर पडतील. कदाचित त्या वेळी शेतजमिनीला मिळणारा मोबदलादेखील चांगला असेल.

प्रश्न नेहमी असा उपस्थित केला जातो, की (१) शेतकऱ्यांनी शेती सोडून दिल्यास देशाची अन्नधान्याची गरज कशी भागावी? (२) आणि शेतकऱ्यांनी शेती



विकून काय करावं?

देशाची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी सत्तर टक्के लोकांनी शेती करण्याची गरज नसते. ३० टक्के लोक शेतीत राहिले किंवा त्यापेक्षा कमीच राहिले, तरीही ते देशाला पुरेल इतके अन्नधान्य निर्माण करू शकतात. कोणत्याही व्यवसायात हवं त्यापेक्षा अधिक मनुष्यबळ असण्याने तो व्यवसाय भरभराटीला कधी येत नसतो. आणि शेतीत मनुष्यबळ कमी राहिल्याने शेतीचा आकार कमी होत नाही, तो आहे तेवढाच राहतो. उलट चांगल्या, उपजाऊ जमिनीची अधिक चांगली मशागत करून अधिक उत्पादन कमी क्षेत्रात घेणे शक्य होते. राहिलेली बरड माळरानाची, कमी पावसाच्या प्रदेशातील कोरडवाहू शेती, जंगल, झाडं, औषधी वनस्पती, औद्योगिक उपयोगास येणाऱ्या इंधन उपयुक्त ठरणाऱ्या वनस्पतींच्या लागवडीसाठी वापरली जाईल. आज असणारी अनेक पिकं कदाचित नामशेष होतील. नवी पिकं येतील.

गेल्या दहापंधरा वर्षांपासून महाराष्ट्रात फळबागाखालील क्षेत्र वाढलेले आहे, त्यामुळे बाजारपेठेतील फळांची उपलब्धता, विविधता वाढली आहे. एकेकाळी केवळ माणूस आजारी असेल आणि त्यास हॉस्पिटलमध्ये दाखल केलेलं असेल, तरच त्यास फळं खायला मिळायची. आज किमान शहरातून तरी ती नैमित्तिक बाब न राहता दररोजच्या आहारातील आवश्यक बाब बनली आहे. माणसाची आर्थिक स्थिती सुधारत जाईल तसतसे त्याचे भरड धान्यावरील अवलंबित्व कमी होत जाते. अधिक गुणवत्तेचे पदार्थ, खाद्यवस्तू, पेयं त्याच्या आहारात समाविष्ट होत जातात. त्यामुळे शेतीतून अतिरिक्त मनुष्यबळ बाहेर पडल्याने कोणत्याही उत्पादनात घट होत नाही, तर दर्जेदार शेतीउत्पादनांची मुबलकता वाढते. शेवटी राहिला प्रश्न तो शेतीतून बाहेर पडलेल्या लोकांनी काय करावं ?

औद्योगिक क्रांती झाली. औद्योगिक उत्पादनं खेड्यापर्यंत पोहोचली. त्र्यं. ना. आत्रे यांनी वर्णिलेला 'गावगाडा' मोडीत निघाला. आलुतेदार आणि बलुतेदार संकल्पना कालबाह्य झाल्या. सुतार, लोहार, सोनार, कुंभार, चांभार, इतर कारागिरीच्या व्यवसायांवर उपजीविका करणाऱ्यांचे पारंपरिक व्यवसाय बंद पडले. काही काळ चाचपडण्यात, इतर क्षेत्रे धुंडाळण्यात गेला; पण म्हणून या अंगी कौशल्य आणि हुन्नर असणाऱ्या समाजगटांना आत्महत्या करण्याची वेळ आली नाही. उलट हे समाजगट गावगाड्यात राहूनही शेती करणाऱ्या समाजगटापेक्षा अधिक बऱ्या अवस्थेत जगायला शिकले. आपल्या अंगच्या उद्योगप्रियतेच्या जोरावर प्रतिकूल

स्थितीवर लवकर मात केली. समाजशास्त्रीय अंगाने कुणी या बाबीचा अभ्यास केला, तर शेती करणाऱ्या समाजगटापेक्षा या हुन्नर असलेल्या, कारागिरी आणि कौशल्य अंगी असणाऱ्या समाजगटातील अधिक लोक शिक्षण, तुटपुंज्या का असेनात; पण नियमित पगार देणाऱ्या नोकऱ्या, इतर लहानमोठे उद्योग या क्षेत्रात अधिक प्रमाणात आढळून येतील. जुन्या जातिपातीच्या उतरंडीवर आधारित समाज रचनेतून बाहेर पडल्याशिवाय या समाजगटांना आपली प्रज्ञा, प्रतिभा दाखविता येणे आणि तिच्या बळावर पुढे जाणे शक्यच नव्हते.

गावगाड्यातून बाहेर पडण्याची ही प्रक्रीया घडलीच नसती तर आज समाज जीवनाच्या विविध क्षेत्रांत नावलौकिक मिळविलेली खेड्यांतून आणि शेती संस्कृतीतून आलेली माणसं दिसलीच नसती. नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, दया पवार, केशव मेश्राम, भालचंद्र नेमाडे, आनंद यादव, रा. रं. बोराडे, ना. धों. महानोर, नागनाथ कोत्तापल्ले, रंगनाथ पठारे, विठ्ठल व राजन गवस, भास्कर चंदनशिव, शंकर बापू आपेगावकर ही नावं साहित्य, कला प्रांतात दिसली नसती. महाराष्ट्राचे अर्धे अधिक प्रशासन शेती आणि संबंधित क्षेत्रातून बाहेर पडलेल्या अधिकाऱ्यांच्या हाती आले नसते.

आज 'कंत्राटी शेती' आणि 'कार्पोरेट फार्मिंग'ची चर्चा सुरू आहे. ती चर्चा नुसती कानावर आली, तरी काही जण 'शिव्-शिव्' काय हे अभद्र ऐकण्याची, पाहण्याची वेळ आली म्हणून अवतीभोवती गोमूत्र शिंपडून, स्वत:ला पावन, शुचिर्भूत करून घेतात.एकेकाळी बंदरातून विलायतेला शिकायला जाणाऱ्याविषयीदेखील हीच भावना व्यक्त केली गेली होती. बाहेरच्या जगातील काही गोष्टी इथे आल्या, म्हणजे जणू काय इथली अर्थव्यवस्था, समाज, संस्कृती नष्टच होणार आहे अशी धारणा ठेवून आदळआपट केली जाते; पण प्रत्यक्षात शेती करताना काय यातना सहन कराव्या लागतात; याची अनुभूती नसल्याने शेतकऱ्यांची बाजू घेऊन आणि त्यांच्या भल्यासाठीच आम्ही सर्व बाबींचा विरोध करीत आहोत, असा आभास निर्माण केला जातो. पूर्वाश्रमीच्या दलित समाजास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मेलेली ढोरं न उचलण्याचा आदेश दिला, तेव्हा एका विद्वानाने त्या ढोराचे मांस आणि कातडी यांपासून मिळणारा मोबदला यांचा हिशेब काढून दलित समाज किती मोठ्या उत्पन्नाला वंचित होणार आहे याचे गणित मांडले होते. तेव्हा बाबासाहेबांनी त्या विद्वानास आवाहन केले होते : ''या गोष्टीपासून जर एवढा



फायदा होणार असेल, तर मग स्वत:च ही मेलेली जनावरं ओढा आणि कातड्यावर कमाई करा.'' आज तोच सल्ला या शेती करणाऱ्या आणि आत्महत्येची वेळ आली तरीही ती सोडू नका म्हणून शेतकऱ्यांना मृत्यूच्या गर्तेत लोटणाऱ्याच्या कटात सहभागी विद्वानांना देण्याची वेळ आली आहे.

जेव्हा दुचाकी आणि चारचाकी स्वयंचलित वाहनं रस्त्यावर आली तेव्हा पायी चालणे आणि बैलगाड्या, घोडे प्रवासाकरिता वापरणाऱ्या समाजात आता किती मोठ्या प्रमाणावर माणसं अपघातात मरण पावतात म्हणून भीतीचे वातावरण निर्माण झाले पण म्हणून माणसं बैलगाडीचाच हट्ट धरून बसली नाहीत. अगदी रेल्वे आणि विमानांचाही स्वीकार झाला. तेव्हाही संस्कृती वगैरे बुडण्याचा धोका वर्तविण्यात आलाच होता. दुसऱ्यांच्या केवळ संपर्काने भ्रष्ट होण्याइतपत संस्कृती तकलादू असेल तर ती केव्हाही नष्ट झालेलीच बरी.

एकेकाळी महाराष्ट्रात कृषी-औद्योगिक क्रांती अवतरणार असल्याचे बोलले जात असे. डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि वैकुंठभाई मेहता, यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील, विठ्ठलराव विखे पाटील, अण्णासाहेब शिंदे या सर्वांची ती धारणा होती; पण बंदिस्त अर्थव्यवस्थेत, सततच्या सरकारी हस्तक्षेपाच्या कालखंडात ही क्रांती अवतरू शकली नाही. साखर कारखानदारीच्या क्षेत्रात, सरकारी कुबड्यांच्या आधार घेऊन उभी राहिलेली पण मुळ सहकारीची कुठलीच तत्त्व न पाळणारी सहकारी चळवळ मूठभर राजकारण्यांसाठी निवडणूक निधी उभी करण्याचे हक्काचे साधनमात्र बनली. शेतीतील अतिरिक्त मनुष्यबळ बाहेर काढण्याची क्षमता ज्या कृषी-औद्योगिकीरणाच्या प्रक्रियेत होती, ती प्रक्रियाच निरोगीपणे पार पडली नाही. त्यामुळे जी गत मुंबईच्या कापड गिरण्यांची झाली तीच गत सहकारी साखर कारखानदारीची झाली.

उद्योगधंद्याच्या क्षेत्रात बंदिस्त अर्थव्यवस्थेत उदयाला आलेली कारखानदारी जशी मोडीत निघाली, तसाच त्या व्यवस्थेचा बळी ठरलेला शेती व्यवसायही मोडीत निघाला; पण उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया काहीशी वेगाने घडून आल्याने 'इन्फोसिस', 'विप्रो', 'रिलायन्स', 'टाटा' यांच्यासह अनेक खासगी कंपन्यांनी इतकी भरारी घेतली, की देश इतर प्रगत देशांसोबत स्पर्धा करण्याइतपत सक्षम होत असल्याचे आशादायक चित्र निर्माण झाले.

शेती आणि शेतकऱ्यास कर्जबाजारीपणाच्या गर्तेतून आणि मृत्यूच्या खाईतून

बाहेर पडण्यासाठीदेखील या आर्थिक उदारीकरणाचीच मदत होणार आहे.

*आज विषाद वाटतो*
*कशा वागवल्या मणामणाच्या बेड्या !*
*गाळात हत्तीचा कळप रुतावा*
*तशा ध्येय, आकांक्षा रुतलेल्या*
*शिळेखाली हात होता,*
*तरी नाही फोडला हंबरडा.*

नारायण सुर्वे यांनी व्यक्त केलेली हीच अवस्था आजपर्यंत शेती करणाऱ्या समूहाची होती. शेतकऱ्यांचा बंदिस्त अर्थव्यवस्थेच्या शिळेखाली गुंतलेला हात आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेमुळेच सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आत्महत्यांच्या घटनांनी ही प्रक्रिया अपरिहार्यतेच्या टोकावर आणून पोहोचविली आहे. शेतीच्या क्षेत्रातून सरकारी हस्तक्षेप दूर झाला. नैसर्गिक बाजार नियमांचे फायदे शेती क्षेत्रास मिळायला लागले, तर भविष्यात काय घडू शकेल, हे निश्चितपणे आज कुणी सांगू शकणार नाही; तरी ढोबळमानाने जे उद्याचे चित्र दिसते ते कसे असेल?

मिश्र, बंदिस्त अर्थव्यवस्थेतदेखील जिथे शेतीमालाला योग्य भाव मिळाला, तेथे सकारात्मक बदल घडून आले आहेत. पश्चिम महाराष्ट्र विशेषत: कोल्हापूर, जिल्ह्यात एकेकाळी गुळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत होते. गुळाच्या विक्रीचे तंत्रही तिथल्या शेतकऱ्यांनी चांगले अवगत केले. त्यामुळे शेतकऱ्यांकडे चार पैसे शिल्लक राहिले. त्यातून ग्रामीण भागात लहानमोठे उद्योग उभे राहिले. ज्या परिसरात सहकारी क्षेत्रातीलच; पण बऱ्यापैकी व्यवस्थापन करून साखर कारखाने नीट चालवून उसाला इतरांपेक्षा चांगला भाव दिला, तेथील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा गेला. आर्थिक उलाढाल वाढली. पंजाबमध्ये काही काळ राज्य सरकारने अन्न महामंडळामार्फत गव्हाला थोडा वाढीव भाव देऊन गहू खरेदी केला. परिणामी लघु उद्योगांचे जाळे संपूर्ण राज्यात उभे राहिले. नासिक तसेच तासगाव, सोलापूर, पुणे, अकलूज, माळशिरस या परिसरात ऊस, द्राक्ष व इतर फळबागांमुळे शेतकऱ्यांकडे काही प्रमाणात पैसे यायला लागले आणि शेतीचे चित्र पालटले. काही ठिकाणी उसापासून साखरेसोबत अल्कोहोल, इथेनॉल निर्मितीचे प्रकल्प उभे राहायला लागले. वायनरी प्रकल्प अनेक ठिकाणी सुरू झाले.



उद्या खासगी क्षेत्रातील काही उद्योजक शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरू करतील. काही ठिकाणी ही प्रक्रिया सुरूदेखील झाली आहे. जे निष्णात शेतकरी आहेत, बुद्धिमत्ता आणि कल्पकतेच्या जोरावर काही भव्यदिव्य शेती क्षेत्रात करू इच्छितात, त्यांना आज कुठलाच वाव नाही. शेती नावालाच खासगी क्षेत्रात आहे. अवतीभवतीचे सर्व बाजार व्यवहार शासन नियंत्रित करते, त्यामुळे कर्तबगार माणसं या क्षेत्राकडे वळत नाहीत आणि ज्यांना या कर्दमातून बाहेर पडायचे आहे; पण कसं बाहेर पडावं याचे मार्ग उपलब्ध नसल्याने, त्यांनाही बाहेर पडता येत नाही. उद्या ही अदलाबदल अधिक सुलभतेने होईल.

आज अनेक शेती उत्पादनांत भारत क्षेत्रफळ आणि एकूण उत्पादन याबाबत जगातील इतर देशांपेक्षा आघाडीवर आहे; पण प्रतिहेक्टर उत्पादनमात्र अत्यंत कमी आहे. त्याचा परिणाम असा झाला, की जमिनीचा पोत, कस न पाहता, जमीन कसण्यायोग्य आहे की नाही ते न पाहता, सरसकट सर्व जमीन पिकाखाली आणली गेली. उद्या प्रतिहेक्टर उत्पादन वाढले तर कदाचित जमिनीच्या क्षमतेनुसार तिचा वापर केला जाईल. चांगली भारी जमीन पिकासाठी, तर डोंगराळ, चढउताराची जमीन जंगलाच्या वाढीकरिता, जनावरांच्या चाऱ्याकरिता राखली जाईल. निसर्ग आणि पर्यावरणाचं योग्य प्रकारे रक्षण करण्याचं भान राखलं जाऊन आजचे ओरबडण्याचे स्वरूप कमी होईल.

कंत्राटी पद्धतीने शेती करणारे, तसेच कॉर्पोरेट फार्मिंग जशी येईल तसे मुळात शेती व्यवसायातच असणारेही अनेक लोक या स्पर्धेत उतरतील आणि टिकून राहतील. यातूनच खरा कृषी-औद्योगिक समाज निर्माण होईल. कदाचित मुंबईसारख्या महानगरांतील नरकप्राय जिणे जगण्याची वेळ आलेले, खेड्यातून स्थलांतरित झालेले झोपडपट्टीवासीय पुन्हा या ग्रामीण भागातून उभ्या राहणाऱ्या उद्योगांत सामावून घेतले जातील. तसेच जसजशी अर्थव्यवस्था सुधारतेय, तसे शहरांतील माणसांचे राहणीमान उंचावत आहे. पोटापाण्याचे प्राथमिक पातळीवरचे प्रश्न सुटल्यावर माणसं अधिक आनंदी, निरामय जगता यावं म्हणून शहरांतील दगदग, जीवघेणी धावपळ यातून बाहेर पडून शहरी गजबजाट आणि गोंधळापासून दूर, निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन राहण्याचा विचार करतात. दळणवळणाची साधने, इंटरनेट, मोबाईल, रस्ते यामुळे उद्योग व्यवसाय कुठेही राहून करता येणे शक्य होत जाणार आहे. शहरातील जीवन भविष्यात जसे अधिकाधिक अनाकर्षक

होत जाईल, तसे धनिकांचे आणि शांतपणे जीवन जगू पाहणाऱ्या मध्यमवर्गीयांचे शहरांकडून खेड्याकडे स्थलांतर वाढणार आहे. जगभरच ही प्रक्रिया घडते आहे. आज शिक्षणाच्या किंवा नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने परदेशांत गेलेली माणसं मुंबईत आल्यावर गुदमरतात. खेड्यात हजार गैरसोयी आज आहेत, उद्या खेड्यांचंही आधुनिकीकरण होईल. शहरातील आणि खेड्यातील अंतर कमी होईल; पण खेड्याची जमिनीशी असणारी नाळ न तुटल्याने त्याची शहरापेक्षा वेगळी ओळख कायम राहील. आहे तेवढ्याच पावसाच्या पाण्याची योग्य बांधबंदिस्ती करून नीट वापर केल्याने, आज उघड्याबोडक्या माळरानांचे स्वरूप आलेल्या शिवारात हिरवेपण अवतरेल. आता सारे हे असेच घडेल, तेही सहजासहजी घडेल असा भाबडा आशावाद बाळगणेही चुकीचे आहे; पण घडून येणारे बदल फार वेगाने घडताहेत. शेवटी येऊ घातलेले बदल ही काही एका राष्ट्राने ठरवून केलेली गोष्ट नाही आणि त्यामध्ये कुणा एका व्यक्तीच्या कर्तबगारीचा भाग नाही. मानवी प्रगतीच्या टप्प्यात अपरिहार्यपणे येणारे हे बदल आहेत. हे बदल अधिक समजूतदारपणे, अधिक जाणकारीने स्वीकारले, तर शेती व्यवसायावरील आज आलेले अरिष्ट टळू शकणार आहे. शेवटी शेतीस कधी वैभवाचे दिवस असल्याचा दाखला इतिहासात सापडत नाही. वर्तमान काळात झालेली शेतीची दुर्दशा भविष्यकाळात काही प्रमाणात तरी कमी होईल, अशी आशा बाळगण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. कोणत्याही आणि कितीही प्रगत राष्ट्राचं उदाहरण पाहिलं तर त्या त्या राष्ट्रातील मागे असलेला वर्ग हा शेतकरीच आहे, कदाचित जगाचा पोशिंदा असणाऱ्याने स्वतः सुखासमाधानाने जगूच नये, असा एखादा शाप या वर्गास आहे की काय कुणास ठाऊक! पण उद्याचे त्याचे जगणे आजच्यापेक्षा कमी वेदनादायी असेल, हे निश्चित.

**



**संदर्भ :-**

१) महात्मा फुले: समग्र वाङ्मय, पान २९७-९८.

२) अजय दांडेकर : शेतकऱ्यांच्या आत्महत्या व ग्रामीण कंगालीकरण, पान क्र. १२२-१२३.

३) अजय दांडेकर, शहाजी नरवडे इ. टाटा समाज विज्ञान संस्थेचा अहवाल : कॉजेस ऑफ फार्मर्स सुसाईड इन महाराष्ट्रा : २००५.

४) शरद जोशी : शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा : 'शेतकरी संघटक', २१ एप्रिल २००६.

५) शरद जोशी : यवतमाळचे दुखणे : 'शेतकरी संघटक', ६ ऑगस्ट २००४.

६) मैथिली भूसनूरमथ : फायनान्शियल एक्स्प्रेस गोलमेज परिषदेतील-भाषणाचा वृत्तांत, लोकसत्ता पुरवणी : डिसेंबर २००५.

तक्ता क्र.१ : कृषी व संबंधित क्षेत्रांतील योजनांअंतर्गत व्यय (कोटी रुपये)

| योजना | एकूण योजना अंतर्गत व्यय | कृषि व संबंधित क्षेत्रासाठी व्यय |
|---|---|---|
| पहिली योजना (१९५१-५६) | २,३७८ | ३५४(१४.९) |
| दुसरी योजना (१९५६-६१) | ४,५०० | ५०१ (११.३) |
| तिसरी योजना (१९६१-६६) | ८,५७७ | १,०८९(१२.७) |
| वार्षिक योजना (१९६६-६९) | ६,६२५ | १,१०७ (१६.७) |
| चौथी योजना (१९६९-७४) | १५,७७९ | २,३२० (१४.७) |
| पाचवी योजना (१९७४-७९) | ३९,४२६ | ४,८६५ (१२.३) |
| वार्षिक योजना (१९७९-८०) | १२,१७७ | १,९९७ (१६.४) |
| सहावी योजना (१९८०-८५) | ९७,५०० | ५,६९५ (५.८) |
| सातवी योजना (१९८५-९०) | १,८०,००० | १०,५२५ (५.९) |
| वार्षिक योजना (१९९०-९१) | ५८,३६९ | ३,४०५ (५.८) |
| वार्षिक योजना (१९९१-९२) | ६४,७५१ | ३,८५१ (६.०) |
| आठवी योजना (१९९२-९७) | ४,३४,१०० | २२,४६७ (५.२) |
| नववी योजना (१९९७-०२) | ८,५९,२०० | ४२,४६२ (४.९) |
| दहावी योजना (२००२-०७) | ३,९८,८९० | २०,६६८ (५.२) |

**टीप :** कंसातील आकडे कृषी व संबंधित क्षेत्रावरील खर्चाची एकूण योजनांअंतर्गत खर्चाशी टक्केवारी दर्शवितात.

**स्रोत :** दहावी पंचवार्षिक योजना, योजना आयोग.



तक्ता क्र. २ : विभागवार आत्महत्यांचे विवरण

| अ.क्र. | प्रशासकीय विभाग (महसूल विभाग) | मार्च २००१ ते डिसेंबर २००४ पर्यंतच्या आत्महत्या | अभ्यासाकरिता निवडलेल्या घटना | जिल्ह्यांचा समावेश |
|---|---|---|---|---|
| १. | अमरावती | ४४८ | २५ | यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम,बुलडाणा. |
| २. | नागपूर | ६६ | ४ | वर्धा आणि नागपूर |
| ३. | औरंगाबाद | ९० | ५ | हिंगोली, जालना, उस्मानाबाद |
| ४. | नासिक | ३८ | २ | जळगाव |
| ५. | पुणे | ०१ | निरंक | निरंक |
| ६. | कोल्हापूर | ०१ | निरंक | निरंक |

तक्ता क्र. ३ : वर्षवार आत्महत्यांचे विवरण

| अ.क्र. | आत्महत्यांचे वर्ष | घडून आलेल्या आमहत्या |
|---|---|---|
| १. | १ मार्च ते ३१ डिसेंबर २००१ | ४१ |
| २. | १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २००२ | ७३ |
| ३. | १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २००३ | १२९ |
| ४. | १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २००४ | ४०१ |

### तक्ता क्र. ४ : सामाजिकस्तर आणि जमिनीची मालकी

| जात | भूमिहीन (भाडे तत्त्वावर शेती करणारे | लहान शेतकरी (५ एकरपर्यंत) | मध्यम शेतकरी (५ते१५एकर) | मोठे शेतकरी (१५ एकर पेक्षा जास्त) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जात | -- | ४ | -- | १ | ५ |
| अनुसूचित जमात | -- | -- | १ | -- | १ |
| इतर मागासवर्गीय | १ | ३ | ४ | २ | १० |
| भटके विमुक्त | १ | ४ | १ | -- | ६ |
| खुला गट | -- | ७ | ५ | २ | १३ |
| एकूण | २ | १८ | ११ | ५ | ३६ |

### तक्ता क्र. ५ : शिक्षण आणि जमीन धारणा

| शिक्षण | भूमिहीन (भाडे तत्त्वावर शेती करणारे) | लहान शेतकरी (५ एकर पर्यंत) | मध्यम शेतकरी (५ते१५एकर) | मोठे शेतकरी (१५ एकरी पेक्षा जास्त) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| अशिक्षित | -- | ६ | -- | १ | ७ |
| तिसरी | -- | १ | -- | १ | २ |
| चौथी | -- | ४ | ४ | १ | ९ |
| पाचवी | -- | -- | १ | -- | १ |
| सातवी | -- | १ | ४ | १ | ६ |
| आठवी | १ | -- | -- | -- | १ |
| नववी | -- | -- | -- | १ | १ |
| दहावी | १ | ६ | २ | -- | ९ |
| एकूण | २ | १८ | ११ | ५ | ३६ |



### तक्ता क्र. ६ : जमीनधारणा व व्यवसाय

| जात | भूमिहीन (भाडे तत्त्वावर शेती करणारे | लहान शेतकरी (५ एकरांपर्यंत) | मध्यम शेतकरी (५ते१५एकर) | मोठे शेतकरी (१५ एकरां पेक्षा जास्त) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| केवळ शेती | -- | २ | २ | २ | ६ |
| शेती व शेतमजुरी | २ | १५ | ६ | -- | १ |
| शेती व दुकान | -- | -- | -- | २ | १० |
| शेती व दुग्धव्यवसाय | -- | -- | १ | -- | ६ |
| शेती व कौशल्याचे काम | -- | १ | २ | १ | १३ |
| एकूण | २ | १८ | ११ | ५ | ३६ |

### तक्ता क्र. ७: शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे- शासकीय यंत्रणेद्वारे सांगिलेली व अभ्यासगटाने शोधून काढलेली.

| अ. क्र. | घटनेचा संदर्भ | मृत्यूस कारणीभूत घटक : शासकीय यंत्रणेद्वारे सांगितलेला | अभ्यासगटाचा घटना क्र. | अभ्यासगटास आढळून आलेले मृत्यूसंबंधीचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | महसूल आयुक्त, नागपूर, अ.क्र. ४६ | कर्जबाजारीपणामुळे नाही. कारण ठाऊक नाही | घटना क्र.२७ | कर्जबाजारीपणामुळे कर्ज रु.७४,०००/- |
| २. | महसूल आयुक्त, नागपूर, अ.क्र.६० | कर्जबाजारीपणामुळे नाही. व्यक्ती जीपचालक होती. | घटना क्र. २१ | कर्जबाजारीपणा व पीक बुडाल्याने, कर्ज रु. १,४०,०००/- |
| ३. | महसूल आयुक्त, नागपूर, अ.क्र. ६९ | आर्थिक अडचणीमुळे. | घटना क्र. २९ | आर्थिक अडचणीमुळे. |
| ४. | महसूल आयुक्त, नागपूर, अ.क्र. ९० | मद्यपानाच्या सवयीमुळे. | घटना क्र. २८ | कर्जबाजारीपणामुळे. कर्ज रु. ५७,०००/- |
| ५. | जिल्हाधिकारी, जालना, संदर्भ .१८ | पीक बुडाले किंवा कर्ज-बाजारीपणामुळे नाही. | घटना क्र. ३५ | कर्जबाजारीपणा व पीक बुडाल्यामुळे, कर्ज रु. ३७,०००/- |
| ६. | जिल्हाधिकारी, जालना, संदर्भ. २५ | कर्जबाजारीपणामुळे नाही. वैयक्तिक कारणामुळे. | घटना क्र. ३६ | कर्जबाजारीपणामुळे,कर्ज रु. ७५,०००/- |

तक्ता क्र. ८ : केंद्र सरकाने जाहीर केलेली किमान आधार किंमत (रुपये प्रति क्विंटल)

| पीक | २००१-२००२ | | २००२-२००३ | | २००३-२००४ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य सरकाने सुचवलेली किं. | केंद्र सरकारतर्फे निश्चित किं. | सुचवलेली किंमत | निश्चित किं. | सुचवलेली किं. | निश्चित किं. |
| १. भात | ९७५ | ५३० | ८५० | ५५० | ९०१ | ५५० |
| २. बाजरी | १०१५ | ४८५ | ८७८ | ४९५ | ९०६ | ५०५ |
| ३. भुईमूग | २५९५ | १९८३ | १९८३ | १३७५ | २०१७ | १४०० |
| ४. तूर | २४२३ | १३२० | १८६९ | १३२५ | १९८५ | १३६० |
| ५. कापूस | ३३०८ | १८७५ | २७६० | १८७५ | २७७५ | १९२५ |
| ६. सूर्यफूल | २६९९ | ११८५ | २२३९ | १२१० | २२६१ | १२५० |
| ७. मूग | २७१६ | १३२० | २२६१ | १३३५ | २३४३ | १३७० |
| ८. उडीद | २५३९ | १३२० | २२०३ | १३३५ | २३६२ | १३७० |
| ९. सोयाबीन | १५९९ | ८८५ | १३५२ | ९८५ | १४०२ | ९३० |
| १०. ऊस | ७४ | ६२ | ६४ | ६५ | ७९ | ७० |
| ११. गहू | १२४४ | ६१० | ११२४ | ३२० | ११४७ | ६३० |
| १२. हरभरा | २१०३ | ११०० | १८३१ | १२०० | १८९२ | १२२५ |

कृषी किंमत केंद्र-महाराष्ट्र शासन

***

# शेतकरी संघटना

या पुस्तिकेत लेखकाने शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे स्वरुप तर सांगितले आहेच, त्याच बरोबर त्याच्या कारणांची विस्ताराने चर्चा केली आहे. एकविसाव्या शतकाच्या प्रारंभकाळातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा आढावा घेतला जाईल तेव्हा या पुस्तिकेचे संदर्भ घेतले जातील, हे या पुस्तिकेचे महत्व आहे...

जनशक्ती वाचक चळवळ